लोकसत्ता सोमवार, १ डिसेंबर २०२५

# कोल्हापूर केंद्रातून पाच एकांकिकांची विभागीय अंतिम फेरीसाठी निवड

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

कोल्हापूर : 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेची प्राथमिक फेरी कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेज येथे दोन दिवस पार पडली. त्यातून पाच एकांकिकांची निवड विभागीय अंतिम फेरीसाठी झाली आहे. १४ डिसेंबर रोजी देवल क्लबच्या मंचावर विभागीय अंतिम फेरीची स्पर्धा होऊन त्यातील एक संघ मुंबई येथे होणाऱ्या महाअंतिम स्पर्धेसाठी निवडला जाईल.

आज (रविवार, २९ नोव्हेंबर) निवडल्या गेलेल्या एकांकिकांमध्ये 'कुपन' (दत्ताजीराव कदम आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज, इचलकरंजी), 'हाफ - वे' (राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, ईश्वरपूर), 'सोयरिक' (आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे), 'ग्वाही' (देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर), 'एक डॉट' (भारती विद्यापीठाचे अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर) यांचा समावेश आहे. स्पर्धेचे परीक्षण धनंजय सरदेशपांडे, पुणे व संजय हळदीकर, कोल्हापूर यांनी केले.

दुसऱ्या दिवशी दत्ताजीराव कदम महाविद्यालय इचलकरंजीने सादर केलेल्या 'घबाड' या एकांकिकेमध्ये गावातील पाणी, शाळेचा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करीत आपल्याला नेमकी गरज कशाची आहे हे अधोरेखित केले गेले.

'ग्वाही' या एकांकिकेत देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूरच्या महाविद्यालयीन कलाकाराने क्षणिक मोहाच्या मागे न लागता विवेकाने कसे जगायला शिकले पाहिजे यावर संयमी टिप्पणी केली.

कोल्हापुरातील शहाजी विधी महाविद्यालयाच्या युवा कलाकारांनी 'अर्थाच्या शोधात' मधून माणसाला हाव आयुष्यातून उठवते. त्यात साधेपणाने आनंद घेता कसा येऊ शकतो यावर प्रकाशझोत टाकला. भारती विद्यापीठाचे अभियांत्रिकी महाविद्यालय कोल्हापूर यांनी 'एक डॉट' एकांकिका सादर करताना एका लेखकाचे मनोगत नाट्यपूर्ण, परिणामकारक मांडले.

INDIA'S LARGEST CONTAINER PORT
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक
LABINDIA Vidu
टॉकीज
Punit Balan Group
सोसायटी
लागू बंधू

- मुख्य प्रायोजक : जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- सहप्रस्तुती : सॉफ्ट कॉर्नर
- सहप्रायोजक : लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल, झी टॉकीज, पुनित बालन ग्रुप, सोसायटी टी, लागू बंधू ज्वेलर्स
- पॉवर्ड बाय : एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च
- सहाय्य : अस्तित्व
- टॅलेंट पार्टनर : आयरिस प्रोडक्शन



'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेला परीक्षक म्हणून उपस्थित राहण्याचे भाग्य लाभले. युवकांमध्ये प्रचंड ऊर्जा, चैतन्य, नावीन्यता असते हे दोन दिवस जवळून अनुभवता आले. नवनवीन विषयावर आजची पिढी अभ्यासपूर्ण सादरीकरण करते हे पाहून आनंद झाला. सादरीकरणाच्या नवनवीन वाटा तरुण पिढी शोधते आहे. हे रंगभूमीसाठी खूपच आशादायक वातावरण आहे. केवळ स्पर्धा करायची म्हणून न करता त्यातील गुणदोष समजून घेत त्यांनी खेळीमेळीने आमच्याशी संवाद साधला. **- धनंजय सरदेशपांडे,** परीक्षक



'लोकसत्ता लोकांकिका'चा मंच म्हणजे जाणिवा प्रगल्भ करणारी एकांकिका स्पर्धा होय. एकांकिकांकडे गंभीरपणे पाहण्याचा तरुणांचा दृष्टिकोन यातून दिसून आला. वेगवेगळ्या आशय विषयावरील सादर झालेल्या एकांकिकांमधून नवीन लिहिते हात निर्माण होत आहेत याची जाणीव झाली. नव्या पिढीसाठी हा मंच खूपच उपयुक्त, प्रेरणादायी आहे. **- संजय हळदीकर** परीक्षक

दि. १०.११.२५ दैनिक केसरी



इचलकरंजी : बालोद्यान अनाथ आश्रमातील मुलांसाठी मदत सुपूर्द करताना डीकेएएससी कॉलेजचे शिक्षक. यावेळी प्रा. रोहित शिंगे, प्रा. प्रथमेश गवळी व कॅडेट उपस्थित होते.

# डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयातर्फे अनाथाश्रमातील मुलांना मदतीचा हात

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी** : डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयात एनसीसी डे उत्साहात साजरा करण्यात आला. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांच्या संकल्पनेतून एनसीसी विभागाने 'बालोद्यान' अनाथ आश्रमातील मुलांसाठी सामाजिक उपक्रम राबविले. कॅडेटनी शहरातून मदतपेटीद्वारे निधी जमा करून ६६ स्वेटर, दोन वॉटर हीटर, १०० किलो साखर व १० डझन वह्या आश्रमाला प्रदान केल्या. मुलांसाठी स्नेहभोजन आणि परिसरात श्रमदानही करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी उपक्रमाचे कौतुक करताना हा महाविद्यालयासाठी अभिमानाचा क्षण आहे, असे सांगितले. गरजू मुलांना मदत करता आली याचा आनंद आहे, अशी भावना एनसीसी प्रमुख प्रा. लेफ्ट. विनायक भोई यांनी व्यक्त केली.

मागील महिन्यात पूरग्रस्तांसाठी सोलापूर येथील महाविद्यालयाला मदत केल्याचाही उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमास प्रा. रोहित शिंगे, प्रा. प्रथमेश गवळी व कॅडेट उपस्थित होते.

कॉलेजचे शिक्षक. यावेळी प्रा. रोहित शिंगे, प्रा. प्रथमेश गवळी व कॅडेट उपस्थित होते.

05/12/25

05/12/25

तरुण भारत बुधवार १० डिसेंबर २०२५

# इचलकरंजीत नेट–सेट परीक्षा कार्यशाळा

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या पदवी व पदव्युत्तर मराठी व हिंदी विभागांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी आयोजित सेट–नेट मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते व डॉ. प्रशांत गायकवाड, प्रा. महेश भोपळे आणि प्रा. अभिषेक चौगले यांचे प्रमुख उपस्थितीत झाले.

प्राचार्य खाडे यांनी उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना सेट नेट परीक्षेचे महत्त्व अधोरेखित केले. महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे मत व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



**इचलकरंजी : सेट–नेट मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, डॉ. प्रशांत गायकवाड, प्रा. महेश भोपळे, प्रा. चौगले.**

सत्र १ मध्ये पेपर नंबर १ वर प्रा. अभिषेक चौगले यांनी मराठी व हिंदी या दोन्ही विषयांच्या पहिल्या पेपरबाबत मार्गदर्शन केले. सत्र २ मध्ये मराठीच्या पेपर क्रमांक २ साठी डॉ. प्रशांत गायकवाड यांचे तर हिंदीच्या पेपर क्रमांक २ साठी प्रा. महेश भोपळे यांनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक, पाहुण्यांची ओळख मराठी विभाग प्रमुख डॉ. सुभाष जाधव यांनी करून दिली. हिंदी विभाग प्रमुख प्रा. निलेश जाधव यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. रोहित शिंगे यांनी केले. यावेळी मराठी विभागातील प्रा. भारती कोळेकर, प्रा. प्रियांका कुंभार, हिंदी विभागातील डॉ. विठ्ठल नाईक, प्रा. सुषमा नामे, डॉ. अंजली उबाळे, प्रा. अपर्णा कांबळे, प्रा. किशोरी टोणपे यांचे सहकार्य लाभले. दोन्ही विभागांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

10/12/25

10/12/25

सकाळ, शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये नेट-सेट परीक्षा कार्यशाळेत प्रमुख वक्त्यांचे स्वागत प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते झाले.

## 'डीकेएएससी'मध्ये नेट-सेट मार्गदर्शन कार्यशाळा

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेज पदवी व पदव्युत्तर मराठी, हिंदी विभागातर्फे सेट-नेट मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. खाडे यांच्या हस्ते झाले. प्रा. अभिषेक चौगले यांनी मराठी व हिंदी या दोन्ही विषयांच्या पहिल्या पेपरबाबत मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात मराठी विषयाच्या पेपर क्रमांक दोनसाठी प्रो. (डॉ.) प्रशांत गायकवाड यांचे तर हिंदी विषयाच्या पेपर क्रमांक दोनसाठी प्रा. महेश भोपळे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. भारती कोळेकर, प्रा. प्रियांका कुंभार, डॉ. विठ्ठल नाईक, प्रा. सुषमा नामे, डॉ. अंजली उबाळे, प्रा. अपर्णा कांबळे, प्रा. किशोरी टोनपे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक आणि पाहुण्यांची ओळख मराठी विभागप्रमुख प्रो. (डॉ.) सुभाष जाधव यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा. रोहित शिंगे यांनी केले. हिंदी विभागप्रमुख प्रा. नीलेश जाधव यांनी आभार मानले.

12/12/25

12/12/25

तरुण भारत शनिवार, १३ डिसेंबर २०२५

# डीकेएएससीची खेलो इंडिया स्पर्धेत कामगिरी

प्रतिनिधी
इचलकरंजी

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डी. के. ए. एस.सी. कॉलेज, इचलकरंजीच्या खेळाडूंनी खेलो इंडिया स्पर्धेत दैदिप्यमान कामगिरी केली. करण घुणके, कौस्तुभ पोकार्ई, स्वानंद अक उदयपूर येथे झालेल्य ५ व्या खेलो इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग क्रीडा प्रकारात शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले.

या स्पर्धेत करण घुणके, स्वानंद अकिवाटे, अमेय भुयेकर व समर्थ सासणे यांनी कयाकिंग या प्रकारातील के ४ बाय २०० मीटर हा प्रकार ३५ सेकंदात पूर्ण करून कास्य पदकाचे मानकरी ठरले. तर प्रणाली कोपार्डे हीने क४–१००० मीटर ४ मिनिट ४३ सेकंद व क२– २०० मीटर हा प्रकार ५०.८५ सेकंदात पूर्ण करून कास्य पदक पटकावले. प्रिया चव्हाण हीने कनोईंग प्रकारातील च१–१००० मीटर या वैयक्तिक प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत कास्य पदकाची मानकरी ठरली.


इचलकरंजी : खेलो इंडिया स्पर्धेत यश मिळविलेल्या डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडूंचा प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी सत्कार केला.

या खेळाडूंनी शिवाजी विद्यापीठ व महाविदयालयास खेलो इंडिया स्पर्धेत पदक प्राप्त करून दिल्याने विद्यापीठाच्या आणि महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. हे सर्व खेळाडू प्रशिक्षक गणेश बरगाले यांचे वरद विनायक बोट क्लब इचलकरंजी येथे सराव करतात.

खेळाडूंचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार सांळुखे, सचिवा शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी कौतुक केले. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

यावेळी महाविद्यालयाचे प्रबंधक श आर. बी. जोग, अधिक्षक प्रकाश कुराडे, वरिष्ठ लिपिक सुनिल अपराध उपस्थित होते. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लंगीवाले, प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

13/12/2025

13/12/25

सकाळ, गुरुवार, १८ डिसेंबर २०२५

# खेलो इंडियातील विजेत्यांचा सत्कार

इचलकरंजी, ता. १७ : डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडूंनी पाचव्या खेलो इंडिया आंतरविद्यापीठ कनोईंग–कयाकिंग स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. राजस्थानमधील उदयपूर येथे झालेल्या या राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धेत कॉलेजच्या खेळाडूंनी पाच कास्यपदकांची कमाई केली. या विद्यार्थ्यांचा कॉलेजतर्फे सत्कार केला.

स्पर्धेत करण घुणके, स्वानंद अकिवाटे, अमेय भुयेकर व समर्थ सासणे यांनी कयाकिंग प्रकारातील के ४-२०० मीटर हा प्रकार अवघ्या ३५ सेकंदात पूर्ण करून कास्यपदक पटकावले. प्रणाली कोपार्डेने के ४-१००० मीटर हा प्रकार ४ मिनिटे ४३ सेकंदात तर के २-२०० मीटर हा प्रकार ५०.८५ सेकंदात पूर्ण करत दोन कास्यपदकांची कमाई केली.

कनोईंग प्रकारातही कॉलेजच्या खेळाडूंनी आपली छाप पाडली. प्रिया चव्हाणने सी १-१००० मीटर या वैयक्तिक प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत कास्यपदक पटकावले. या सर्व खेळाडूंनी शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनीही खेळाडूंचा सत्कार केला. खेळाडूंना प्रशिक्षक गणेश बरगाले, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई, स्वप्नील सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले.



इचलकरंजी : खेलो इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या यशस्वी खेळाडूंचा प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी सत्कार केला.

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
२४ डिसेंबर २०२५/

# आजची तरुणाई उद्याचे आरोग्य : डॉ. वैशाली वाघमारे

**इचलकरंजी** : आजची तरुणाई उद्याचे आरोग्य असून युवकांनी स्वतःच्या आरोग्याची जबाबदारी ओळखून निरोगी जीवनशैली अंगीकारली पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. वैशाली वाघमारे यांनी केले. एड्सविषयी योग्य माहिती घेऊन गैरसमज दूर करणे आणि समाजात जनजागृती करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

जागतिक एड्स दिनाच्या अनुषंगाने एड्स जनजागृती अभियान राबविण्यात आलेयावेळी कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. वाघमारे बोलत होते.

दत्ताजीराव कदम आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, इचलकरंजी येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनाच्या अनुषंगाने एड्स जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत महाविद्यालय परिसरात पदयात्रा काढण्यात आली तसेच विद्यार्थ्यांसाठी पोस्टर मेकिंग व रिल्स मेकिंग स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक डॉ. सुनील भोसले, डॉ. अजिंक्य पत्रावळे, प्रा. संदीप पाटील, निलेश जाधव, प्रा. रोहित सदलग उपस्थित होते. पोस्टर मेकिंग व रिल्स मेकिंग स्पर्धांचे परीक्षण डॉ. स्वप्नजीत मुळीक, डॉ. सुनील भोसले व डॉ. निलोफर शेख यांनी केले.

विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन सन्मानित केले. पोस्टर मेकिंग स्पर्धेत मुस्कान मुल्ला हिने प्रथम, सिद्धी खांडेकर हिने द्वितीय तर प्रीती भिसे व सानिका यादव यांनी संयुक्तपणे तृतीय क्रमांक पटकावला.

रिल्स मेकिंग स्पर्धेत अर्शद पाथरवट याने प्रथम, आरती कणके हिने द्वितीय तर तुषार कोंडेकर याने तृतीय क्रमांक मिळवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी केले.

सकाळ, शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचा सन्मान करण्यात आला.

# 'डीकेएएससी'तर्फे एड्स जनजागृती अभियान

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेज राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि रेड रिबन क्लब यांच्यातर्फे एड्स जनजागृती अभियान राबविले. याअंतर्गत पदयात्रा, पोस्टर मेकिंग आणि रिल्स मेकिंग स्पर्धा आयोजित केल्या. अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. अर्चना वाघमारे यांनी आजची तरुणाई उद्याचे आरोग्य असून, महाविद्यालयीन युवकांनी उत्तम आरोग्य जोपासले पाहिजे, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील भोसले, डॉ. अजिंक्य पत्रावळे, प्रा. संदीप पाटील, नीलेश जाधव, प्रा. रोहित सदलगे आदी उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी केले. अनुक्रमे पोस्टर मेकिंग स्पर्धेत मुस्कान मुल्ला, सिद्धी खांडेकर, प्रीती भिसे व सानिका यादव. रिल्स मेकिंग स्पर्धेत अर्शद पाथरवट, आरती कणके, तुषार कोंडेकर यांनी यश मिळविले.

26/12/2025

26/12/25

तरुण भारत शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५



**इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेजमध्ये पोस्टर मेकिंग स्पर्धाचे बक्षीस वितरण प्रसंगी डॉ. अर्चना वाघमारे, डॉ. सुनील भोसले, डॉ. अजिंक्य पत्रावळे आदी.**

# आजची तरुणाई उद्याचे आरोग्य : डॉ. अर्चना वाघमारे

**इचलकरंजी :** आजची तरुणाई उद्याचे आरोग्य असून महाविद्यालय युवकांनी उत्तम आरोग्य जोपासले पाहिजे, असे मत डॉ. अर्चना वाघमारे यांनी व्यक्त केले. येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि रेड रिबन क्लब यांच्या विद्यमाने जागतिक एड्स दिनाच्या अनुषंगाने एड्स जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अंतर्गत महाविद्यालयात पदयात्रा पोस्टर मेकिंग स्पर्धा, रिल्स मेकिंग स्पर्धा झाल्या. यावेळी प्राचार्य डॉ. एस के खाडे रासेयो कार्यक्रम समन्वयक डॉ. सुनील भोसले, डॉ. अजिंक्य पत्रावळे, प्रा. संदीप पाटील, निलेश जाधव, प्रा. रोहित सदलगे उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षण डॉ. स्वप्नजीत मुळीक, डॉ. सुनील भोसले डॉ. निलोफर शेख यांनी केले. स्पर्धकांना पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी केले. स्पर्धेचा निकाल : पोस्टर मेकिंग स्पर्धा – मुस्कान मुल्ला, सिद्धी खांडेकर, प्रीती भिसे, सानिका यादव, रिल्स मेकिंग स्पर्धा – अर्शद पाथरवट, आरती कणके, तुषार कोंडेकर.

**केसरी** २७ डिसेंबर २०२५



इचलकरंजी : मतदान जनजागृती अभियान डीकेएएससी कॉलेजमध्ये राबवण्यात आले.

# डीकेएएससी कॉलेजमध्ये मतदान जनजागृती अभियान

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : इचलकरंजी महानगरपालिका सार्वजनिक निवडणूक स्वीप उपक्रमाच्या माध्यमातून स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ज्युनिअर कॉलेज येथे मतदान जनजागृती अभियान उत्साहात पार पडले. याप्रसंगी स्वीपचे नोडल अधिकारी शंकर पवार, सहायक नोडल अधिकारी सूर्यकांत शेटे, सचिन खोंद्रे, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात उपस्थितांना मतदानाचे महत्त्व, लोकशाहीमध्ये नागरिकांची भूमिका व जबाबदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सर्व उपस्थितांनी लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची व मतदान करण्याची प्रतिज्ञा घेतली. याप्रसंगी प्रा. व्ही. व्ही. भोई, प्रा. एम. डी. लगिवाले, प्रा. व्ही. पी. पाटील, प्रा. आर. बी. शिरढोणे, प्रा. प्रथमेश गवळी, प्रा. निलेश जाधव, आर. बी. जोग, स्वप्निल सूर्यवंशी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

27/12/2025

27/12/25

सकाळ मंगळवार, ६ जानेवारी २०२६

# 'डीकेएएससी' कॉलेजमध्ये एकदिवसीय कार्यशाळा

इचलकरंजी, ता. ५ : येथील डीकेएएससी कॉलेजमध्ये इलेक्ट्रॉनिक्स विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने लीड कॉलेज उपक्रमांतर्गत 'व्यक्तिमत्त्व विकासात सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले. कार्यशाळेत महाविद्यालयातील ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे होते, तर शिवभूषण जाधव यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. जाधव यांनी आपल्या मार्गदर्शनात संवादकौशल्य, आत्मविश्वास, संघभावना, वेळ व्यवस्थापन व सकारात्मक दृष्टिकोन या सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व सविस्तरपणे स्पष्ट केले. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नसून, सॉफ्ट स्किल्सच्या माध्यमातूनच यशस्वी व प्रभावी व्यक्तिमत्त्व घडते, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य खाडे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कार्यशाळा आवश्यक असल्याचे अधोरेखित केले.

इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख प्रा. डी. ए. यादव यांनी स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. एन. पी. मोटे यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा. पी. बी. मत्तीकल्ली यांनी केले, तर एस. व्ही. खोत यांनी आभार मानले. प्रा. एस. ए. गाठ, प्रा. एन. टी. भानुसे, महावीर कांबळे यांनी परिश्रम घेतले.



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये कार्यशाळेत प्रमुख वक्ते शिवभूषण जाधव यांचे स्वागत प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी केले.

06/01/2026

872845

07/01/26

तरुण भारत गुरुवार, १५ जानेवारी २०२६

# पारंपरिक वेशभूषा दिन...







इचलकरंजी : मकर संक्रांतीनिमित्त स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डीकेएसी महाविद्यालय आणि अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय येथे पारंपरिक वेशभूषा दिनाचे आयोजन केले होते. यानिमित्ताने अनेक महाविद्यालयीन तरुण–तरुणी भारतीय वेशभूषेत येऊन वेगवेगळ्या उपक्रमात सहभागी झाले होते. (छाया : सचिन तिगडी)

16/1/26

16/01/26

सकाळ शुक्रवार, १६ जानेवारी २०२६



**माले** : डीकेएएससी कॉलेजच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे स्वागत प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी केले.

# जंगलांचे जतन करणे काळाची गरज : डॉ. शिंदे

## मालेत 'डीकेएएससी' कॉलेजचे श्रमसंस्कार शिबिर

इचलकरंजी, ता.. १५ : वनस्पती व जंगलांचे जतन करणे हे मानवी जीवनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असून ही आजच्या काळाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

'डीकेएएससी' कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनांतर्गत मौजे माले येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच राहुल कुंभार होते. मालेची भूजल पातळी वाढवणे. तसेच पर्जन्यमान वाढीस हातभार लागावा, या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर आयोजित केल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. स्वागताध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे होते. यावेळी मालेगावातील पाणी फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी, एनएसएस प्रकल्प अधिकारी डॉ. सुनील भोसले, डॉ. अजिंक्य पत्रावळे, श्रीमती पूजा पारिशवाड, डॉ. सुभाष जाधव आदी उपस्थित होते. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अजिंक्य पत्रावळे यांनी आभार मानले.

Lib.
16/01/2026

16/01/26

तरुण भारत सोमवार, १९ जानेवारी २०२६



इचलकरंजी : भारतीय सैन्यदलात निवड झाल्याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. के. खाडे.

# 'डीकेएएससी'च्या एनसीसी विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात निवड

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयातील एनसीसी विभागातील प्रथमेश नराळ, असिफ मुजावर यांची भारतीय सैन्यदलात निवड झाली. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे. यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. देशसेवेसाठी महाविद्यालयातील एनसीसी विभागातून कॅडेट नेहमीच आर्मी, नेव्ही व पोलिस भरतीमध्ये भरती होतात. महाविद्यालयाला अभिमान वाटावा अशी कामगिरी एनसीसी विभाग करत असल्याची भावना प्राचार्यांनी व्यक्त केली. प्रा. लेफ्ट. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले. एनसीसी विभागाच्या गौरवशाली परंपरेत सातत्य ठेवल्याचे समाधान व्यक्त केले. यावेळी प्रा. व्ही. पी. पाटील, प्रा. शशिकांत कुंभार, प्रा. मुजफ्फर लगिवाले, प्रा. प्रथमेश गवळी, प्रा. मोरे, प्राध्यापक, प्रशासकीय स्टाफ, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

19/01/26

19/01/26

सकाळ, गुरुवार, २२ जानेवारी २०२६

# 'डीकेएएससी'च्या विद्यार्थ्यांची निवड

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातील एनसीसी विभागातील विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात निवड झाली. प्रथमेश नराळ व असिफ मुजावर यांचा निवडीबद्दल प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते सत्कार केला.

23/01/26

तरुण भारत शुक्रवार, २३ जानेवारी २०२६

# `एनएसएस`मधून गावचा विकास

## सरपंच राहुल कुंभार : 'डीकेएएससी'च्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

प्रतिनिधी
इचलकरंजी

**एनएसएस कॅम्पच्या माध्यमातून प्रत्येकाने गावचा विकास कसा करायचा याविषयी विचार करून कार्य केले पाहिजे, असे मत मालेचे सरपंच राहुल कुंभार यांनी व्यक्त केले.**

दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. खाडे होते.

ते पुढे म्हणाले, माले गावात केलेले जलसंवर्धनाचे आणि वृक्षारोपणाचे काम केले आहे. पारंपरिक गाव स्वच्छतेला फाटा देऊन दीर्घकाळ गावाला उपयुक्त ठरणाऱ्या गोष्टी यातून साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. गावची भूजल पातळी या कामामुळे वाढली असून लवकरच आपल्या गावात ऑक्सिजन पार्क तयार होईल याचा मला विश्वास आहे. हे कार्य पुढील अनेक वर्षे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून आम्ही करणार आहोत.

उपसरपंच प्रताप पाटील यांनी, माले गावची भूजल पातळी वाढण्याचे सांगून भूजल संवर्धन करून पाण्याचा प्रश्न कायमचा संपवण्यासाठी पुढील अनेक वर्षे आम्ही पाणी फौंडेशनच्या माध्यमातून प्रयत्न करत आहोत.



माले : डीकेएएससी कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी सरपंच राहुल कुंभार, समवेत प्रो. डॉ. एस. के. खाडे, उपसरपंच प्रताप पाटील डॉ. सुनील भोसले.

यावेळी प्रो. डॉ. सुभाष जाधव, डॉ. सुभाष इंगळे उपस्थित होते. या विशेष श्रम संस्कार शिबिराच्या कालखंडात विविध विषयावर प्रबोधनपर व्याख्याने झाली. संजय खुळ यांच्या हस्ते श्रमसंस्कारचे भूमिपूजन करून श्रमदानास सुरुवात झाली.

प्रास्ताविक डॉ. अजिंक्य पत्रावळे यांनी केले. यावेळी पूजा पारीशवाड, संदीप पाटील, माले पाणी फौंडेशनचे सर्व पदाधिकारी संतोष खोत, राहुल कांबळे, स्वाती डफळे, जयश्री नरुटे, आक्काताई कांबळे, मीना मालेकर उपस्थित होते.

सूत्रसंचालन निलेश जाधव यांनी केले. आभार एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील भोसले यांनी मानले.

23/01/26

23/01/26

सकाळ, सोमवार, २६ जानेवारी २०२६



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात डॉ. अमोल पाटील यांनी मार्गदर्शन केले.

# डीकेएएससी कॉलेजमध्ये सामाजिकशास्त्र मंडळाचे उद्घाटन

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये सामाजिकशास्त्र मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी 'सामाजिक शास्त्रे व नोकरीच्या संधी' या विषयावर प्रमुख वक्ते डॉ. अमोल पाटील यांनी मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षांमध्ये सामाजिक शास्त्राची जबाबदारी वाढली असून सामाजिक शास्त्रांच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत मिळणाऱ्या नोकरीच्या संधी असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी प्रा. विजय पाटील होते. प्रास्ताविक डॉ. अरुण कटकोळे यांनी केले. प्रा. विशाल कांबळे यांनी आभार मानले. प्रा. शेफाली पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अशोक बोगुलवार, प्रा. दिगंबर नागर्थवार उपस्थित होते.

सकाळ, बुधवार, २८ जानेवारी २०२६

## डीकेएएससी कॉलेज

प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते ध्वजवंदन केले. प्रा. लेफ्टनंट विनायक भोई यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी विभागातर्फे तिरंगा ध्वजाला सलामी दिली. सांस्कृतिक विभागाने राष्ट्रगीत, ध्वजगीतासह, देशभक्तिपर गीत सादर केली. प्रा. डी. ए. यादव, प्रबंधक रघुनाथ जोग, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.चंद्रानी बागडी, प्रा. एम. एम. कांबळे, प्रा. व्ही. पी. पाटील यांची उपस्थिती होती.

27/01/26

27/01/26.

सकाळ, गुरुवार, २९ जानेवारी २०२६



शिवनाकवाडी : कन्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी मार्गदर्शन केले.

# कन्या महाविद्यालयाचे शिवनाकवाडीत श्रमसंस्कार शिबिर

इचलकरंजी, ता. २८ : महाविद्यालयीन स्तरावरील निवासी श्रमसंस्कार शिबिरातून स्वयंसेविकांना आयुष्यभराच्या व्यक्तिमत्त्व विकासाची शिदोरी प्राप्त होते, असे मत डीकेएएससी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस के खाडे यांनी व्यक्त केले.

श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष संस्कार शिबिराचे उद्‌घाटन मौजे शिवनाकवाडी येथे झाले. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. मुख्याध्यापक तुकाराम राजुगडे, न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक व्ही. के. जाधव, प्रा. व्ही. बी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. त्रिशला कदम म्हणाल्या, 'राष्ट्रीय सेवा योजनेतून जीवनाला योग्य दिशा प्राप्त झाल्याने शिक्षण आणि सामाजिक कार्याचा तोल सांभाळता आला. विद्यार्थिनींना श्रम संस्कार आणि जीवनमूल्ये विकसित करण्यासाठी अशा शिबिरांचा उपयोग होतो.'

प्रा. प्रियांका साळोखे, प्रा. बिना बोरगे, डॉ. सविता भोसले, कॅप्टन प्रमिला सुर्वे, तानाजी भारती, प्रदीप खोत आदी उपस्थित होते. प्रास्ताविक आणि पाहुण्यांची ओळख कार्यक्रम अधिकारी डॉ. धीरज शिंदे यांनी केली. सूत्रसंचालन प्रा. अंकुश कुरणे यांनी केले. आभार प्रा. स्वाती हाळवणकर यांनी मानले.

सकाळ, गुरुवार, २९ जानेवारी २०२६



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये मराठी साहित्य लेखन कार्यशाळेत लेखक अशोक जाधव यांनी मार्गदर्शन केले.

# लेखन कला नव्हे तपश्चर्या

## अशोक जाधव : डीकेएएससी कॉलेजमध्ये कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. २८ : लेखन ही कला नाही, तर ती तपश्चर्या आहे, असे मत भंगार पुस्तकाचे लेखक अशोक जाधव यांनी व्यक्त केले. डीकेएएससी कॉलेजमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित मराठी साहित्य लेखन कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे होते.

पुढे मार्गदर्शन ते म्हणाले, 'लेखक घडवता येत नाही तो स्वतः घडावा लागतो. लेखक होण्यासाठी अनेक वर्षांचा कालावधी जावा लागतो. साहित्य म्हणजे मानवी अनुभवाची सर्जनशील मांडणी असते. लेखकाच्या मनात विचार येण्यासाठी समाजात गेले पाहिजे. अनुभव माणसाला लिहिण्यास प्रवृत्त करतो. यातून नैसर्गिकरीत्या लेखन होते. समाजातील प्रश्नांची जाणीव मनात निर्माण होते ती खरी सर्जनशीलता आहे. प्रत्येक लेखनाची सुरुवात एका ठिणगीतून होते. दुःख, आठवण, अनुभव आदी गोष्टींचा उपयोग लेखनासाठी केला पाहिजे.' कार्यशाळेसाठी दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर, श्रीमती आ. रा. पाटील कन्या महाविद्यालयाचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक डॉ. सुभाष जाधव यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. रोहित शिंगे यांनी केले. आभार डॉ. अनिता आंबेकर यांनी मानले. डी. ए. यादव, नीलेश जाधव आदी उपस्थित होते.

29/01/26

29/01/26.

सकाळ शुक्रवार, ३० जानेवारी २०२६



**इचलकरंजी** : डीकेएएससी कॉलेजमध्ये विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थी व गुरुदेव कार्यकर्त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# डीकेएएससी कॉलेजमध्ये विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण

इचलकरंजी, ता. २९ : येथील डीकेएएससी कॉलेजमध्ये श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहाचा सांगता समारंभ व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्पर्धेच्या शाखास्तरीय स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ झाला. प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक कृष्णात करपे होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे उपस्थित होते.

संस्थेचे आजीव सेवक भूपाल कुंभार, प्राचार्य डॉ. चंद्राणी बागडी, माजी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांची प्रमुख उपस्थिती होती. सप्ताहात घेण्यात आलेल्या विविध गटांतील वक्तृत्व, निबंध, चित्रकला, कराओके व सुगम गायन याबरोबरच पाककला, रस्सीखेच स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थी व गुरुदेव कार्यकर्त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविले.

दरम्यान, सप्ताहाचा प्रारंभ ग्रंथालयातर्फे ग्रंथदिंडी व उद्घाटन समारंभाने झाला. सप्ताह काळात विविध स्पर्धा, व्यापार महोत्सव, पारंपरिक वेशभूषा दिन, फ्लॉवर अरेंजमेंट प्रदर्शन, विविध विषयांवरील व्याख्याने असे उपक्रम वाङ्मय मंडळ, सांस्कृतिक विभाग, एनएसएस विभाग, विवेक वाहिनी यांच्यातर्फे आयोजित केले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा वाढदिवस शिदोरी दिन म्हणून विविध उपक्रमांनी साजरा झाला.

या दिवशी ग्रंथ प्रदर्शन, ज्ञानशिदोरी ग्रंथभेट आणि एनसीसी व क्रीडा विभागातर्फे रक्तदान शिबिर तसेच एनएसएस विभागातर्फे आरोग्य तपासणी शिबिर झाले. प्रा. डी. ए. यादव, प्रा. व्ही. पी. पाटील. डॉ. दीपक कुंभार, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. पी. के. वाघमारे, अधीक्षक आर. बी. जोग आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक वाङ्मय मंडळप्रमुख प्रा. रोहित शिंगे यांनी केले. सप्ताहातील स्पर्धांचे निकाल वाचन प्रा. शशिकांत कुंभार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अंजली उबाळे यांनी केले. डॉ. प्रभा पाटील यांनी आभार मानले.

ICHMH51 News

28.01.2026



संस्थाप्रार्थनेने सुरू झालेल्या समारोप समारंभाचे प्रास्ताविक वांग्मय मंडळ प्रमुख प्रा. रोहित शिंगे यांनी तर सप्ताहातील स्पर्धांचे निकाल वाचन ज्यूनि. विभाग प्रमुख प्रा. शशिकांत कुंभार यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे सत्र प्रमुख प्रा. डी. ए. यादव, प्रा. व्ही. पी. पाटील. आय क्यू ए सी प्रमुख डॉ. दीपक कुंभार, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पी. के. वाघमारे,अधीक्षक श्री. आर. बी. जोग यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. डॉ. प्रभा पाटील यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन डॉ. अंजली उबाळे यांनी केले.

ग्रंथदिंडी प्रसंगी प्रा एस के खाडे व महाविद्यालयीन कर्मचारी

पारितोषिक वितरण समारंभात साहित्यिक कृष्णात करपे व प्रा एस के खाडे

ICH MH51 Ichalkaranji News 28.01.2026



# डीकेएएससी मध्ये श्री स्वामी विवेकानंद सप्ताहाची सांगता... ग्रंथदिंडी, ज्ञानशिदोरी दिन, स्पर्धा यांसह विविध उपक्रमांनी सप्ताह संपन्न...

इचलकरंजी :

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहाचा सांगता समारंभ व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्पर्धेच्या शाखास्तरीय स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध साहित्यिक वक्ते श्री. कृष्णात करपे यांच्या उपस्थितीत व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला. समारंभास संस्थेचे आजीव सेवक श्री. भूपाल कुंभार, माजी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, प्राचार्य डॉ. चंद्राणी बागडी यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी सप्ताहात घेण्यात आलेल्या विविध गटातील वक्तृत्व, निबंध, चित्रकला, कराओके व सुगम गायन याबरोबरच पाककला, रस्सीखेच स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थी व गुरुदेव कार्यकर्त्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना प्रमुख पाहुणे श्री. करपे म्हणाले, " विवेकानंदांचे, बापूजींचे विचार विद्यार्थ्यांनी स्वतःच्या जीवनामध्ये आत्मसात करून वाटचाल करायला हवी. महाविद्यालयात जीवन हे स्वप्नांसाठी झपाटून कष्ट करण्याचे वय आहे याची जाणीव या सप्ताहाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना व्हायला हवी यासाठी सप्ताह व स्पर्धा महत्त्वाच्या आहेत. "

अध्यक्षीय मनोगतात बोलताना प्राचार्य डॉ. खाडे म्हणाले की, " शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, स्वामी विवेकानंद आणि संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांचे विचार आणि कार्य यांची उजळणी या विवेकानंद सप्ताहाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी गुरुदेव कार्यकर्त्यांनी केली. त्यांचे वैचारिक कार्य हे विद्यार्थी पुढे घेऊन जातील." असे विचार व्यक्त करत त्यांनी यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन केले. यावेळी मा. श्री भूपाल कुंभार, प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांची मनोगते झाली.

सप्ताहाचा शुभारंभ ग्रंथालयाच्या वतीने भव्य ग्रंथ दिंडी व उद्घाटन समारंभाने झाला. सप्ताह काळात विविध स्पर्धा, व्यापार महोत्सव, पारंपारिक वेशभूषा दिन, फ्लॉवर अरेंजमेंट प्रदर्शन, विविध विषयावरील व्याख्याने असे उपक्रम वाङ्मय मंडळ, सांस्कृतिक विभाग, एन एस एस विभाग, विवेक वाहिनी यांच्या वतीने आयोजित केले गेले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब यांचा वाढदिवस सप्ताह दरम्यान शिदोरी दिन म्हणून संपन्न झाला. या दिवशी ग्रंथ प्रदर्शन, ज्ञानशिदोरी ग्रंथभेट आणि एनसीसी व क्रीडा विभागाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 51 विद्यार्थी गुरुदेव कार्यकर्त्यांनी रक्तदान केले. याच दिवशी एनएसएस विभागाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न झाले.

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
३० जानेवारी २०२६



इचलकरंजी : शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना प्रा. एस. के. खाडे व्यासपीठावर प्रा. त्रिशला कदम.

# श्रमसंस्कारातून व्यक्तिमत्व विकासाची शिदोरी : प्राचार्य एस. के. खाडे

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** श्रमसंस्कारातून व्यक्तिमत्व विकासाची शिदोरी मिळते, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी केले. ते मौजे शिवनाकवाडी येथे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष संस्कार शिबिराच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. मोठ्या उत्साहात झाले.

यावेळी विद्यामंदीर शिवनाकवाडीचे मुख्याध्यापक तुकाराम राजुगडे, न्यु हायस्कुलचे मुख्याध्यापक व्ही. के. जाधव, प्रा. व्ही. बी. पाटील यांनी आपली मनोगते व्यक्त केले. प्र. प्राचार्य डॉ. त्रिशला कदम म्हणाल्या, एन.एस.एस. मधून आपल्या जीवनास योग्य दिशा प्राप्त झाल्याने शिक्षण आणि सामाजिक कार्य याचा तोल सांभाळता आला.

प्रास्ताविक डॉ. धीरज शिंदे यांनी केले. आभार प्रा. स्वाती हाळवणकर यांनी मानले. सूत्रसंचलन प्रा. अंकुश कुरणे यांनी केले. प्रा. प्रियांका साळोखे, प्रा. बिना बोरगे, डॉ. सविता भोसले, कॅप्टन प्रमिला सुर्वे, स्वयंसेविका उपस्थित होते.

30/01/26

तरुण भारत
शनिवार, ३१ जानेवारी २०२६

# डीकेएएससीमध्ये श्री स्वामी विवेकानंद सप्ताहाची सांगता

## ग्रंथदिंडी, ज्ञानशिदोरी दिन, स्पर्धा यांसह विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग

**प्रतिनिधी**
**इचलकरंजी**

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहाचा सांगता समारंभ व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्पर्धेच्या शास्त्रीय स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ साहित्यिक वक्ते कृष्णात करपे यांच्या उपस्थितीत व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात झाला.

समारंभास संस्थेचे आजीव सेवक भूपाल कुंभार, माजी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, प्राचार्य डॉ. चंद्राणी बागडी यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी सप्ताहात घेण्यात आलेल्या विविध गटातील वक्तृत्व, निबंध, चित्रकला, कराओके व सुगम गायन याबरोबरच पाककला, रस्सीखेच स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थी व प्राध्यापक मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहाचा सांगता समारंभात मान्यवरांचे स्वागत करताना प्राचार्य एस. के. खाडे.

करपे म्हणाले, महाविद्यालयात जीवन हे स्वप्नांसाठी झपाटून कष्ट करण्याचे वय आहे याची जाणीव या सप्ताहाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना व्हायला हवी यासाठी सप्ताह व स्पर्धा महत्त्वाच्या आहेत.

प्राचार्य डॉ. खाडे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, स्वामी विवेकानंद आणि संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांचे विचार आणि कार्य यांची उजळणी या विवेकानंद सप्ताहाच्या निमित्ताने विद्यार्थी, प्राध्यापकांनी केली. त्यांचे वैचारिक कार्य हे विद्यार्थी पुढे घेऊन जातील.

सप्ताहाचा शुभारंभ ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथ दिंडी व उद्घाटन समारंभाने झाला. सप्ताह काळात विविध स्पर्धा, व्यापार महोत्सव, पारंपारिक वेशभूषा दिन, फ्लॉवर अरेंजमेंट प्रदर्शन, विविध विषयावरील व्याख्याने असे उपक्रम वाङ्मय मंडळ, सांस्कृतिक विभाग, एन एस एस विभाग, विवेक वाहिनी यांच्या वतीने आयोजित केले गेले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब यांचा वाढदिवस सप्ताह दरम्यान शिदोरी दिन म्हणून झाला. या दिवशी ग्रंथ प्रदर्शन, ज्ञानशिदोरी ग्रंथभेट आणि एनसीसी व क्रीडा विभागाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी ५१ विद्यार्थी, प्राध्यापकांनी रक्तदान केले. याच दिवशी एनएसएस विभागाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात झाले.

प्रास्ताविक वाङ्मय मंडळ प्रमुख प्रा. रोहित शिंगे यांनी केले. सप्ताहातील स्पर्धांचे निकाल वाचन ज्यूनि. विभाग प्रमुख प्रा. शशिकांत कुंभार यांनी केले. यावेळी प्रा. डी. ए. यादव, प्रा. व्ही. पी. पाटील, आयक्यूएसी प्रमुख डॉ. दीपक कुंभार, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पी. के. वाघमारे, ग्रंथपाल प्रतिभा पाचंगे, डॉ. स्वाती देसाई, अधीक्षक आर. बी. जोग, प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. डॉ. प्रभा पाटील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. अंजली उबाळे यांनी केले.

31/01/26

31/01/26

तरुण भारत सोमवार, २ फेब्रुवारी २०२६



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेज येथे महिला सक्षमीकरण आणि अंतर्गत तक्रार कमिटीतर्फे आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. एस. के. खाडे, व्यासपीठावर डॉ. प्रभा पाटील, डॉ. रुपाली सांभारे, संजय खूळ, अर्पणा कांबळे.

# कौशल्य शिक्षण घेऊन आत्मनिर्भर होणे गरजेचे

▪ प्राचार्य डॉ एस. के. खाडे

प्रतिनिधी
इचलकरंजी

शिक्षणाबरोबरच कौशल्य शिक्षण घेऊन आत्मनिर्भर होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी अशा कौशल्य अभ्यासक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी केले.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे महिला सक्षमीकरण आणि अंतर्गत तक्रार कमिटीच्यावतीने सोमवार १ फेब्रुवारी २०२६ ते १५ मार्च २०२६ दरम्यान राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (एन एस डी सी) च्या सहकार्याने सुरू होत असलेल्या हस्तकला भरतकाम: डिझाइनिंग आणि फिनिशिंग या सरकारमान्य प्रमाणपत्र कोर्सच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. माजी विद्यार्थी संजय खुळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

संजय खुळ यांनी, विविध शासकीय प्रमाणपत्र कोर्स संदर्भात माहिती दिली. अशा कोर्सचे भविष्यात होणारे फायदे आणि व्यवसाय-नोकरीसाठी उपलब्ध असणाऱ्या संधी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. खाडे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच अशा कौशल्य विकास कोर्स मधून व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळते. म्हणून अशा कोर्स साठी विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभागी होणे काळाची गरज बनल्याचे नमूद केले.

महाविद्यालयातील महिला सक्षमीकरण कक्ष आणि अंतर्गत तक्रार निवारण कमिटीच्या समन्वयक डॉ. प्रभा पाटील यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. त्यांनी कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी आणि आत्मनिर्भर नागरिक बनणे क्रमप्राप्त असल्याची नोंद केली. संवाद सामाजिक मंडळाच्या प्रकल्प समन्वयिका अर्पणा कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ. रुपाली सांभारे यांनी केले. आभार धनश्री हनबर हिने मानले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

02/02/2026

02/02/26

सकाळ, बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६

# काळाची गरज ओळखून तंत्रस्नेही बना

## डॉ. प्रकाश मुंज : डीकेएएससी कॉलेजमध्ये हिंदी कार्यशाळा

■ **सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. ३ : कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे आज सर्वच क्षेत्रांत आमूलाग्र बदल घडत आहेत. लेखन, संपादन, अनुवाद, भाषा प्रक्रिया ही कौशल्ये अधिक वेगवान व परिणामकारक होत असताना मानवी मूल्ये, नैतिकता आणि भाषेची शुद्धता जपणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे भाषेच्या विद्यार्थ्यांनी काळाची गरज ओळखून वेळीच तंत्रस्नेही बनावे, असे आवाहन भाषातज्ज्ञ डॉ. प्रकाश मुंज यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे होते.

येथील डीकेएएससी कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत आयोजित एकदिवसीय हिंदी कार्यशाळेत डॉ. मुंज विषयतज्ज्ञ म्हणून बोलत होते. 'हिंदी भाषेचा जागतिक परिप्रेक्ष्य आणि रोजगार' या विषयावर प्रमुख वक्ते डॉ. रमेश खबाले यांनी हिंदी भाषेचा जागतिक विस्तार, आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढणारा वापर आणि त्यातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या विविध संधी यांचा आढावा घेतला.



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये हिंदी कार्यशाळेत प्रमुख वक्त्यांचे स्वागत प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी केले.

कार्यशाळेसाठी अग्रणी समितीच्या समन्वयक डॉ. नीलोफर शेख व सदस्य डॉ. सुनील भोसले यांचे सहकार्य लाभले. प्रा. डी. ए. यादव, डॉ. सुभाष जाधव, डॉ. अशोक बोगलवार, प्रा. संदीप पाटील, प्रा. राजकुमार गीते, प्रा. राहुल कांबळे, प्रा. रोहित शिंगे, प्रा. कल्पना जाधव, डॉ. माधव मुंडकर, डॉ. नाजिम शेख, डॉ. विठ्ठल नाईक, डॉ. सुषमा नामे आदी उपस्थित होते. हिंदी विभागप्रमुख प्रा. नीलेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अंजली उबाळे व प्रा. अपर्णा कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. किशोरी टोणपे यांनी आभार मानले.

गुरुवार, ५ फेब्रुवारी २०२६ तरुण भारत संवाद

# शेत मोजणीचे तंत्र डीजीपीएसमुळे होणार सोपे

## हेक्सागोनचे सिनिअर इंजिनिअर अनिरुद्ध कपूर : ड्रोन, डीजीपीएस सर्वेक्षणाचे भूगोलातील उपयोजनवर कार्यशाळा

प्रतिनिधी
इचलकरंजी

येत्या काळात शेत मोजणीचे तंत्र डीजीपीएसमुळे सोपे होईल, अशी माहिती हेक्सागोन, पुणे येथील सिनिअर इंजिनिअर अनिरुद्ध कपूर यांनी दिली. येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमधील भूगोलशास्त्र विभागाच्यावतीने ड्रोन व डीजीपीएस सर्वेक्षणाचे भूगोलातील उपयोजन यावर एकदिवसीय अग्रणी कार्यशाळेत ते बोलत होते.



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजच्या भूगोलशास्त्र विभागांमध्ये अग्रणी कार्यशाळेमध्ये सहभागी तज्ज्ञ.

कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख विभागप्रमुख डॉ. सुनिल भोसले यांनी करून दिली. अग्रणी महाविद्यालय योजना समन्वयक डॉ. निलोफर शेख यांनी शिवाजी विद्यापीठ अग्रणी योजनेविषयी माहिती दिली.

प्रथम सत्रात तारामित्र ड्रोन अकॅडमीच्या अकाउंटेबल मॅनेजर व हेड ऑफ ऑपरेशन पूजा नाईक निंबाळकर यांनी ड्रोन अप्लिकेशन व लायसन्स प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉ. एम. ए. पाटील उपस्थित होते. सिनिअर रिमोट इन्स्ट्रक्टर परनवी नाईक निंबाळकर व चेन्नई येथील ड्रोन पायलट सैफुल इस्लाम यांनी हॅण्ड्स-ऑन ड्रोन ट्रेनिंगचे प्रात्यक्षिक सादर केले.

दुसऱ्या सत्रात अनिरुद्ध कपूर यांनी, डीजीपीएसचा वापर करून भूमापन व आधुनिक सर्वेक्षण तंत्रज्ञानावर माहिती दिली. डॉ. निलेश सुरवसे यांनी, डीजीपीएस तंत्रज्ञान व विविध वापरावर मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. राजेखान शिकलगार उपस्थित होते.

समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे दुपार सत्र प्रमुख प्रा. डी. ए. यादव, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील डॉ. एच. बी. पाटील यांच्या हस्ते प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. अतिश पाटील, डॉ. सचिन जाधव यांनी केले. आभार प्रा. मेहबूब माणगावे यांनी मानले. यावेळी विविध महाविद्यालयांतील, प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

05/02/2026

05/02/26

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
६ फेब्रुवारी २०२६/५

# भविष्यात शेत मोजणीचे तंत्र डीजीपीएसमुळे सोपे होणार

## अनिरुद्ध कपू : डी.के.ए.एस.सी कॉलेजमध्ये अग्रणी कार्यशाळा



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी कार्यशाळेचे उद्घाटनप्रसंगी प्रा. एस. के. खाडे, अनिरुद्ध कपूर, डॉ. सुनिल भोसले, डॉ. निलोफर शेख व इतर मान्यवर.

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी येथील भूगोलशास्त्र विभागांच्यावतीने मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी ड्रोन व डी.जी.पी.एस. सर्वेक्षणाचे भूगोलातील उपयोजन या विषयावर एकदिवसीय अग्रणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्याहस्ते झाले. प्रास्ताविक डॉ. सुनिल भोसले यांनी केले, तर अग्रणी महाविद्यालय योजना समन्वयक डॉ. निलोफर शेख यांनी शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी योजनेविषयी माहिती दिली.

प्रथम सत्रात तारा-मित्र ड्रोन अकॅडमीच्या अकाउंटेबल मॅनेजर व हेड ऑफ ऑपरेशन मा. पूजा नाईक निंबाळकर यांनी ड्रोन अप्लिकेशन व लायसन्स प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉ. एम. ए. पाटील उपस्थित होते. तसेच सिनिअर रिमोट इन्स्ट्रक्टर परनवी नाईक निंबाळकर व चेन्नई येथील ड्रोन पायलट सैफुल इस्लाम यांनी हॅण्ड्स-ऑन ड्रोन ट्रेनिंग चे प्रात्यक्षिक सादर केले.

दुसऱ्या सत्रात हेक्सागोन, पुणे येथील सिनिअर इंजिनिअर अनिरुद्ध कपूर यांनी DGPS चा वापर करून भूमापन व आधुनिक सर्वेक्षण तंत्रज्ञानावर माहिती दिली. डॉ. निलेश सुस्वरे यांनी डीजीपीएस तंत्रज्ञान व विविध वापर या विषयावर मार्गदर्शन केले. सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉ. राजेखान शिकलगार उपस्थित होते.

समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे दुपार सत्र प्रमुख प्रा. डी. ए. यादव, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील डॉ. एच.बी. पाटील यांच्याहस्ते प्रमाणपत्रांचे वितरण केले. सूत्रसंचालन डॉ. अतिश पाटील व डॉ. सचिन जाधव यांनी केले, आभार प्रा. मेहबूब माणगावे यांनी मानले.

06/02/26

06/02/26

तरुण भारत शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६

# सांस्कृतिक कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये ऊर्जा निर्माण होते

## आजीव सेवक श्रीराम साळुंखे : कन्या महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ

प्रतिनिधी
इचलकरंजी

महाविद्यालयातील वेगवेगळे बदल आणि सांस्कृतिक कार्यक्रम हे विद्यार्थ्यांमध्ये एक नवीन ऊर्जा निर्माण करतात. अशा कार्यक्रमामधून विद्यार्थ्यांना वाव देण्याची गरज आहे, असे मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजीव सेवक श्रीराम साळुंखे यांनी काढले.

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि विविध गुणदर्शन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. प्रसिद्ध फिंद्री कादंबरीच्या लेखिका डॉ. सुनिता बोर्डे–खडसे यांची प्रमुख उपस्थिती होती.



इचलकरंजी : कन्या महाविद्यालयातील प्रा. रेखा माळी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या भगिनी विमल माळी यांनी महाविद्यालयास दिलेल्या देणगीमधून स्मार्ट क्लासरूमचे उद्घाटन करताना श्रीराम साळुंखे, डॉ. बोर्डे–खडसे.

महाविद्यालयातील प्रा. रेखा माळी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या भगिनी विमल माळी यांनी महाविद्यालयास दिलेल्या देणगीमधून स्मार्ट क्लासरूमचे उद्घाटन करण्यात आले त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. विमल माळी यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. सुनिता बोर्डे–खडसे यांनी, स्त्रियांच्या आयुष्यातील संघर्ष, आयुष्यामध्ये काहीतरी मिळवण्यासाठी त्यांना करावा लागणारा त्याग आणि त्यांच्या पाठीशी उभा राहणारा समाज याचे वर्णन त्यांनी सांगितले.

स्वागताध्यक्ष प्रा. संगीता पाटील यांनी शैक्षणिक अहवाल वाचन केले. जिमखाना विभागप्रमुख डॉ. सविता भोसले यांनी जिमखाना विभागाचे अहवाल वाचन केले. स्वागत, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. त्रिशला कदम यांनी केले. यावेळी महाविद्यालय विकास समिती सदस्य संजय खुळ, सुभाष बलवान, कार्यालयीन अधीक्षक संजय गुजर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या प्रा. वर्षा पोतदार, एएससी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे हायस्कूलचे मुख्याध्यापक बिरनाळे, गर्ल्स हायस्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती पाटील उपस्थित होत्या. अनिल कुंभार, मैत्री फौंडेशनचे चंद्रप्रकाश छाजेड, वहीदा नेजकर, विजय मगदूम विन इन्फोटेक, जयसिंगपूर, तृप्ती पगारे, डॉ. त्रिशला कदम, प्रा संगीता पाटील, ग्रंथपाल मिनाज नायकवडी यांनी महाविद्यालयाला देणगी दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. दुपारच्या सत्रामध्ये विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम पार पडला. यामध्ये विद्यार्थिनींनी विविध नृत्य प्रकार सादर केले. सूत्रसंचालन प्रा. स्वाती हाळवणकर, प्रा. अंकुश कुरणे यांनी केले. आभार डॉ. अनिता आंबोकर यांनी मानले.

सकाळ शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६

# डीजीपीएस तंत्रज्ञान भूमापनात क्रांती घडवेल

## अनिरुद्ध कपूर : डीकेएएससी कॉलेजमध्ये ड्रोन, डीजीपीएस सर्वेक्षण कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. ५ : परंपरागत शेतमोजणीच्या मर्यादा दूर करत अचूकता, वेग व पारदर्शकता देणारे आधुनिक डीजीपीएस तंत्रज्ञान येत्या काळात भूमापन क्षेत्रात क्रांती घडवेल, असे प्रतिपादन हेक्सागोन, पुणे येथील सिनिअर इंजिनिअर अनिरुद्ध कपूर यांनी केले. डीकेएएससी कॉलेजमधील भूगोलशास्त्र विभागातर्फे आयोजित 'ड्रोन व डीजीपीएस सर्वेक्षणाचे भूगोलातील उपयोजन' या एकदिवसीय अग्रणी कार्यशाळेत ते बोलत होते.



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये ड्रोन व डीजीपीएस सर्वेक्षण कार्यशाळेत ड्रोन ट्रेनिंगचे प्रात्यक्षिक सादर करत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला.

कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते झाले. पहिल्या सत्रात तारा-मित्र ड्रोन अकॅडमीच्या अकाउंटेबल मॅनेजर व हेड ऑफ ऑपरेशन पूजा नाईक निंबाळकर यांनी ड्रोन तंत्रज्ञानाचे विविध उपयोग, त्याचे शैक्षणिक व व्यावसायिक महत्त्व तसेच ड्रोन लायसन्स प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष प्रा. डॉ. एम. ए. पाटील होते. यावेळी ड्रोन पायलट सैफुल इस्लाम यांनी हॅण्ड्स-ऑन ड्रोन ट्रेनिंगचे प्रात्यक्षिक सादर करत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला. डॉ. नीलेश सुस्वरे यांनी डीजीपीएस तंत्रज्ञानाचे विविध उपयोजन व भूगोल विषयातील संशोधन संधी यावर मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष प्रा. डॉ. राजेखान शिकलगार होते. समारोप सत्रात प्रा. डी. ए. यादव व विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील डॉ. एच.बी.पाटील यांच्या हस्ते सहभागी प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. विभागप्रमुख डॉ. सुनील भोसले यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांची ओळख करून दिली. अग्रणी महाविद्यालय योजना समन्वयक डॉ. निलोफर शेख यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या अग्रणी योजनेची माहिती दिली. सूत्रसंचालन डॉ. अतिश पाटील व डॉ. सचिन जाधव यांनी केले, तर आभार प्रा. मेहबूब माणगावे यांनी मानले. या कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयांतील तसेच डीकेएएससी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

### शासकीय, खासगीत डीजीपीएसला मागणी

श्री. कपूर यांनी डीजीपीएस तंत्रज्ञानाद्वारे भूमापन, शेतजमिनीची मोजणी, सीमांकन व आधुनिक सर्वेक्षण प्रक्रियेचे विवेचन केले. भविष्यात शासकीय व खासगी क्षेत्रात डीजीपीएसला मागणी राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तरुण भारत सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६



इचलकरंजी : डीकेएएससी येथे इंग्रजी विभाग आयोजित कार्यक्रमात प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. खाडे, डॉ. अशोक कोळेकर, डॉ. प्रभावती पाटील.

# 'सोशल मीडियामुळे बदलतेय इंग्रजी भाषा'

**इचलकरंजी :** डी.के.ए.एस.सी. महाविद्यालय इंग्रजी विभाग आयोजित ऑब्जरवेशन ऑफ इंग्लिश वीक अंतर्गत 'लेट्स लव इंग्लिश, लेट्स लर्न इंग्लिश' पोस्टर प्रेझेंटेशन व आधुनिक इंग्रजी वापरावर समाजमाध्यमांचा प्रभाव यावर व्याख्यान झाले.

ऑब्जरवेशन ऑफ इंग्लिश वीक अंतर्गत "लेट्स लव इंग्लिश, लेट्स लर्न इंग्लिश" पोस्टर प्रेझेंटेशनचे अनावरण प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. खाडे, प्रमुख अतिथी डॉ. अशोक कोळेकर व विभागप्रमुख डॉ. प्रभावती पाटील यांच्या हस्ते झाले.

प्राचार्य डॉ. खाडे यांनी, इंग्रजी भाषा काळाची गरज असून प्रत्येक विद्यार्थ्यांने आत्मसात केली पाहिजे, असे मत व्यक्त केले. माजी विद्यार्थी डॉ. अशोक कोळेकर यांनी, सोशल मीडियाचा इंग्रजी भाषेवर होणारा प्रभाव तसेच सोशल मीडियाचा योग्य आणि विवेकी वापर केल्यास विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषिक कौशल्यात लक्षणीय सुधारणा होऊ शकते, असे नमूद केले. तसेच सोशल मीडिया हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून, योग्य मार्गदर्शनाखाली ते इंग्रजी भाषा शिकण्यासाठी, आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि संवाद कौशल्य विकसित करण्यासाठी प्रभावी माध्यम ठरू शकते, असे त्यांनी विविध उदाहरणांद्वारे सांगितले. तसेच त्यांनी स्वलिखित पुस्तके महाविद्यालयास भेट स्वरूपात दिली. प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रभावती पाटील यांनी केले. आभार प्रा. संदीप पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. श्रद्धा बरगाले यांनी केले. कार्यक्रमास इंग्रजी विभागातील प्रा. अर्चना नंदगावे, प्रा. पद्मा पाटील, प्रा. स्नेहल लिंग्रस, विद्यार्थी उपस्थित होते.

HVR

09/02/26

लोकमत गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६

# सहायक प्राध्यापकांच्या भरतीला अखेर मान्यता

## ५,०१२ रिक्त पदे भरण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाची मंजुरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील खासगी अनुदानित महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापकांची प्रलंबित भरती होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने खासगी अनुदानित महाविद्यालयांतील ५,०१२ रिक्त पदे भरण्यास मंजुरी दिली आहे. त्यातून राज्यातील १,१७२ कॉलेजांमध्ये सहायक प्राध्यापक मिळणार आहेत.

राज्यातील अनुदानित महाविद्यालयांमध्ये सद्यःस्थितीत प्राध्यापकांची जवळपास ११ हजार पदे रिक्त आहेत. त्यांतील ५,०१२ पदे भरण्यास मंजुरी मिळाली आहे. दरम्यान, यापूर्वी राज्य सरकारने २०१८ आणि २०२१ मध्ये ३,५८० पदांच्या भरतीला मान्यता दिली होती. मात्र, त्यानंतर मोठ्या प्रमाणात प्राध्यापक सेवानिवृत्त झाले आहेत. त्यातून रिक्त पदांची संख्या वाढली आहे. राज्य सरकारने ५,०१२ पदांची भरती प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करावी, तसेच विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी उर्वरित रिक्त पदांची भरतीही लवकर सुरू करून सर्व महाविद्यालयांना मनुष्यबळ द्यावे, अशी मागणी 'मस्ट' या प्राध्यापक संघटनेचे अध्यक्ष डॉ. विजय पवार यांनी केली.



“ राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिक्षक पदभरती गरजेची होती. या माध्यमातून कॉलेजांना आवश्यक शिक्षकी मनुष्यबळ मिळेल, तसेच १,१७२ कॉलेजांमध्ये एनईपी अंमलबजावणीसाठी ही सकारात्मक बाब आहे.

**- डॉ. शैलेंद्र देवळाणकर,** उच्च शिक्षण, संचालक

### नॅक नसलेल्या कॉलेजांतील पदे भरणार नाही

खासगी अनुदानित महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापक भरतीसाठी नॅक मान्यता बंधनकारक केली आहे. नॅक मानांकन केले नाही, त्या कॉलेजांमध्ये नवीन पदनिर्मिती केली जाणार नाही, तसेच नॅक मूल्यांकन कमी असलेल्या कॉलेजांना ते वाढवण्यासाठी तीन वर्षांचा सवलतीचा कालावधी देण्याचा विचार आहे. त्याचा प्रस्ताव उच्च शिक्षण संचालक यांना सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

12/02/26

12/02/26

तरुण भारत बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६

# डीकेएएससीमध्ये विद्यार्थी–पालक मेळावा

प्रतिनिधी,
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम महाविद्यालयात कॉमर्स विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी – पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात झाला. कार्यक्रमाची सुरुवात पालकांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे होते.

स्वागत व हेतू कथन प्रा. पूजा पारिशवाड यांनी केले. प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. विजय पाटील यांनी केले. मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुभाष जाधव, अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अशोक बोगुलवार यांनी विद्यार्थी घडविण्यात पालक–शिक्षक समन्वयाचे महत्त्व अधोरेखित केले.



इचलकरंजी : पालक, विद्यार्थी मेळाव्यात मनोगत व्यक्त करताना पालक रेखा वाले, समवेत प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, व मान्यवर.

यावेळी पालक, विद्यार्थी व शिक्षक यांच्यात सातत्यपूर्ण सुसंवाद आवश्यक असल्याचा सूर व्यक्त झाला. विद्यार्थ्यांच्या मोबाईल वापरावर नियंत्रण, योग्य मित्रपरिवार, वेळेचा सदुपयोग आणि संस्कारमूल्यांची जपणूक याकडे पालकांनी विशेष लक्ष द्यावे, असे मार्गदर्शन करण्यात आले. प्राचार्य डॉ. खाडे यांनी महाविद्यालयातील पायाभूत सुविधा, बजाज फिनसर्व कोर्स, एम्ब्रॉयडरी कोर्स आदी उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात पालकांची भूमिका निर्णायक असल्याचे सांगितले.

पालक प्रतिनिधी रेखा वाले, अर्चना मिठारी यांनी मनोगत व्यक्त केले. केले. सूत्रसंचालन आयटी विभागाच्या स्वप्नल जगदाळे यांनी केले. आभार प्रा. डॉ. आर. एस. रोड्रिक्स यांनी मानले. मेळाव्यास प्राध्यापक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

HVR

सकाळ बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात झालेल्या विद्यार्थी-पालक मेळाव्यात प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी मार्गदर्शन केले.

# पालक, विद्यार्थी, शिक्षकांमध्ये सातत्याने सुसंवाद आवश्यक

## डीकेएएससी महाविद्यालयातील मेळाव्यात सूर

■ सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. १७ : विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सुदृढ संस्कार यासाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थी या त्रिसूत्रीमध्ये सातत्यपूर्ण सुसंवाद अत्यावश्यक असल्याचा सूर डीकेएएससी महाविद्यालयात झालेल्या विद्यार्थी-पालक संयुक्त मेळाव्यात उमटला. कॉमर्स विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात पालकांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. प्रा. डॉ. सुभाष जाधव आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अशोक बोगुलवार यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच जीवनमूल्ये, शिस्त, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन या घटकांवर मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे होते. त्यांनी महाविद्यालयातील पायाभूत सेवा-सुविधा, अद्ययावत अभ्यासक्रम यांसह विविध कोर्स यासारख्या कौशल्याधारित उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे अधोरेखित केले. मोबाईलचा मर्यादित व योग्य वापर, मित्रसंगत, वेळेचे नियोजन, अभ्यासातील सातत्य आणि संस्कार याकडे पालकांनी विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले.

पालक प्रतिनिधी म्हणून रेखा वाले व अर्चना मिठारी यांनी मनोगत व्यक्त करत महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व वैयक्तिक विकासासाठी राबविलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. प्रा. कल्पना जाधव, प्रा. प्रथमेश गवळी, प्रा. पल्लवी होगाडे, प्रा. कोमल सुतार, अर्थशास्त्र विभागातील प्रा. वर्षा शिंदे, प्रा. राजकुमार गीते, प्रा. शेफाली पाटील, इंग्रजी विभागातील प्रा. अर्चना नंदगावे, प्रा. पद्मा पाटील आदी उपस्थित होते.

स्वागत व मेळाव्याचा हेतू प्रा. पूजा पारिशवाड यांनी स्पष्ट केला. प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. विजय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन स्वप्नल जगदाळे यांनी केले. आभार प्रा. डॉ. सौ. आर. एस. रॉड्रिक्स यांनी मानले.

18/02/26

18/02/26

सकाळ, सोमवार, २३ फेब्रुवारी २०२६



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात पोस्टर स्पर्धा झाली.

# डीकेएएससी महाविद्यालयातर्फे पोस्टर स्पर्धा

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या गणित विभागामार्फत पोस्टर स्पर्धा झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. खाडे होते. डी. जे. मुंगारे, डॉ. एस. टी. सुतार यांनी आयोजन केले. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पायचा इतिहास, संगीतातील गणित, स्थापत्यशास्त्रातील गणित, अंकगणिती, हरवलेल्या पैशांचा इतिहास आदी विषयांवर माहितीपूर्ण पोस्टर्स सादर केली. निकालात पायचा इतिहासमध्ये प्रसन्न परीत, अपूर्वा सावसे यांनी प्रथम, स्थापत्यशास्त्रातील गणितमध्ये अनुजम नगराची, वैभवी माने यांनी द्वितीय, तर अंकगणितीमध्ये कोमल कांबळे, प्रिया भोसले यांनी तृतीय क्रमांक पटकावला. परीक्षण डॉ. विनायक पवार, सौरभ मोरे, सूरज पठाण यांनी केले. पारितोषिक वितरण डॉ. एस. टी. इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

23/02/26

सकाळ गुरुवार, २६ फेब्रुवारी २०२६



इचलकरंजी : बी कॉम आयटी विभागाची बियाणी टेक्नॉलॉजी, कोल्हापूर, छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट (सायबर) व शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी येथे अभ्यास भेट झाली.

# 'डीकेएएससी'च्या विद्यार्थ्यांची अभ्यास भेट

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाच्या बी कॉम आयटी विभागाच्या विद्यार्थ्यांची कोल्हापूर येथे अभ्यास भेट झाली. भेटीदरम्यान बियाणी टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड, कोल्हापूर येथील कामकाजाची माहिती घेतली. त्यानंतर सायबर इन्स्टिट्यूटमध्ये एमसीए व एमबीए विभाग भेटी झाल्या. भेटीदरम्यान एमसीए विभागाच्या प्रमुख डॉ. सौ. कामत यांनी प्रवेश परीक्षा पद्धती, प्रक्रिया याबद्दलची माहिती सादर केली. शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी विभागांतर्गत एमसीए विभागास भेट झाली. या भेटीदरम्यान विद्यापीठाची एमसीएची स्वतंत्र परीक्षा पद्धतीबद्दलची माहिती देण्यात आली. विभाग प्रमुख प्रा. विजय पाटील, आय टी विभागाच्या प्रा. स्वप्नल जगदाळे, प्रा. पल्लवी होगाडे आदी उपस्थित होते.

26/02/26

सकाळ, गुरुवार, २६ फेब्रुवारी २०२६



इचलकरंजी : मिरज येथे झालेल्या विभागस्तरीय युवा महोत्सवात डीकेएएससी कॉलेजने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

# डीकेएएससी कॉलेज युवा महोत्सवात विजेते

इचलकरंजी, ता. २५ : विभागस्तरीय युवा महोत्सवात डीकेएएससी कॉलेजने विविध वैयक्तिक व सांघिक स्पर्धांमध्ये घवघवीत यश संपादन करत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सांगली यांच्यातर्फे 'जागर संस्कृतीचा उत्सव - छात्रशक्तीचा' या ब्रीदवाक्याखाली गुलाबराव पाटील मेमोरियल ट्रस्ट यांच्या सहकार्याने मिरज येथे या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

महोत्सवात कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला. स्पर्धेत लघुनाटिका, समूहगीत, मातीकाम, वैयक्तिक नृत्य व लोककला नृत्य या प्रकारात प्रथम, लोकनृत्य (मुली), कविता लेखन व रिल मेकिंगमध्ये द्वितीय, तर लोकनृत्य (मुले), चित्रकला, वाद्यवृंद व रांगोळी या प्रकारात तृतीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाने सांस्कृतिक गुणवत्तेची छाप उमटवली. वैयक्तिक सुगम गायन प्रकारात उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

यासाठी महेश गवंडी, तुषार पाटील, प्रकाश कोळी व आनंद गुळगुंजे यांनी दिग्दर्शन केले. प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. खाडे यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थी कलाकारांचा सत्कार केला. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. पी. के. वाघमारे, डॉ. ए. एच. बोगुलवार तसेच सांस्कृतिक समितीतील सदस्यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६




इचलकरंजी : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आयोजित फोक प्रवाह स्पर्धेत जनरल चॅम्पियनशिप मिळविलेल्या दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यासमवेत प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, मार्गदर्शक प्राध्यापक.

# फोक प्रवाह स्पर्धेत एएससी कॉलेज विजेता

प्रतिनिधी
इचलकरंजी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदआयोजित फोक प्रवाह स्पर्धेत दत्ताजीराव कदम ए. एस. सी महाविद्यालयाने जनरल चॅम्पियनशिप मिळविले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सांगली, जागर संस्कृतीचा उत्सव छात्र शक्तीचा हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून फोक प्रवाह विभाग स्तरीय युवा महोत्सव गुलाबराव पाटील मेमोरियल ट्रस्ट यांच्यावतीने मिरज येथे संपन्न झाला . या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली व सातारा या तिन्ही जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

या स्पर्धेअंतर्गत वैयक्तिक व सांघिक स्पर्धा यांचे आयोजन केले होते. निकाल असा – लघुनाटिका – प्रथम, समूहगीत – प्रथम, मतिकाम – – प्रथम, वैयक्तिक नृत्य – प्रथम, लोककला नृत्य– प्रथम, लोकनृत्य मुली – द्वितीय, कविता लेखन – द्वितीय, रिल मेकिंग – द्वितीय, लोकनृत्य मुले – तृतीय, चित्रकला – तृतीय, वाद्यवृंद – तृतीय, रांगोळी – तृतीय, वैयक्तिक सुगम गायन – उत्तेजनार्थ.

स्पर्धेसाठी महेश गवंडी, तुषार पाटील, प्रकाश कोळी, आनंद गुळगुंजे यांचे कोरिओग्राफर म्हणून मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पी. के. वाघमारे, प्रा. डॉ. ए. एच. बोगुलवार, सदस्यांचे सहकार्य लाभले.

27/02/26

27/02/26

सकाळ शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६

# 'डीकेएएससी'मध्ये केमिस्ट्री कार्निव्हल

इचलकरंजी, ता. २७ : येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागामार्फत 'केमिस्ट्री कार्निव्हल' हा उपक्रम विविध शैक्षणिक व प्रात्यक्षिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात झाला. कार्निव्हलमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्याहस्ते तसेच वनिता ॲग्रोकेमिकल्सचे फॅक्टरी व्यवस्थापक सुधीर गोलंगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत केले. श्री गोलंगडे यांनी दैनंदिन जीवनातील रसायनशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करून विज्ञान क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी संशोधनवृत्ती जोपासावी, प्रयोगशीलता वाढवावी आणि विज्ञानाधारित शिक्षणातून समाजोपयोगी कार्य करावे, असे आवाहन केले.

कार्निव्हलच्या प्रारंभी केमिस्ट्री मॅजिकल प्रयोग, पोस्टर सादरीकरण आणि केम प्रश्नमंजूषा या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मॅजिकल प्रयोगामध्ये ५०, पोस्टर सादरीकरणात ४०, प्रश्नमंजूषामध्ये १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.विशेषतः केमिस्ट्री मॅजिकल प्रयोग हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. यासोबतच संपूर्ण आठवडाभर व्यावसायिक संधी, प्रयोगशाळा सुरक्षा व्यवस्थापन, रसायनशास्त्रातील मुलाखत कौशल्ये, औद्योगिक भेट, शैक्षणिक प्रकाशनासाठी संशोधन रचना व वैज्ञानिक लेखन, स्पर्धात्मक परीक्षांसाठी धोरणात्मक तयारी अशा विविध विषयांवर कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. समारोपप्रसंगी पारितोषिक वितरण समारंभ झाला.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात केमिस्ट्री कार्निवलमध्ये केमिस्ट्री मॅजिकल प्रयोग स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अभिनव प्रयोग सादर केले.

सकाळ, शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजची खेळाडू लक्ष्मी पाटील हिची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्वाँदो स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

# डीकेएएससी कॉलेजतर्फे लक्ष्मी पाटीलचा सत्कार

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजची खेळाडू लक्ष्मी पाटील हिची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्वाँदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धेत ६२ किलो वजनीगटात तिने सुवर्णपदक मिळविल्याने तिने शिवाजी विद्यापीठाच्या संघात स्थान निश्चित केले. तिची ओडिशा येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्वाँदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल तिचा प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी सत्कार केला. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुझफ्फर लगीवाले, लेफ्टनंट प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

28/02/26

28/02/26

तरुण भारत बुधवार, ४ मार्च २०२६

# सातत्यपूर्ण संघर्षाने जीवन यशस्वी करता येते

- अभिनेते संजय मोहिते
- डीकेएएससीमध्ये पारितोषिक वितरण

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

हसऱ्या चेहऱ्यामागे अनेकदा कठोर परिश्रम आणि वेदनादायी अनुभव दडलेले असतात. यश सहज मिळत नाही; त्यासाठी सातत्य, जिद्द आणि अपार मेहनत आवश्यक असते, जीवनात चांगले संस्कार आणि चांगले मित्र या दोन्ही बाबी भविष्य ठरवत असतात, असे मत अभिनेते संजय मोहिते यांनी व्यक्त केले.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील वार्षिक पारितोषिक वितरण व शिक्षक, विद्यार्थी गुणगौरव समारंभात ते बोलत होते. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली, प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते यशस्वी खेळाडू, विद्यार्थी, कलाकार, प्राध्यापकांचा सन्मान करण्यात आला.



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयमध्ये पारितोषिक वितरणप्रसंगी अभिनेते संजय मोहिते, कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. एस. के. खाडे.**

कौस्तुभ गावडे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा वारसा हे यशस्वी विद्यार्थी, खेळाडू आणि गुरुदेव कार्यकर्ते पुढे नेत आहेत याचा मला अभिमान वाटतो. सचोटीने कष्ट करणाऱ्या प्रत्येकाच्या वाट्याला यश मिळतेच. आपण बापूजींच्या संस्था संस्कारात पुढे जात आहोत याचं भान नेहमी जपायला हवे. दुपारच्या सत्रात शेला पागोटे आणि सायंकाळी सांस्कृतिक विभागाने बहारदार नृत्यांचा अविष्कार सादर केला.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. सुभाष जाधव यांनी करून दिला. कार्याध्यक्ष प्रा. व्ही. पी. पाटील, प्रा. बाळासाहेब चावरे, प्रा. मुजफ्फर लगीवाले यांनी अहवाल वाचन केले.

यावेळी कन्या महाविद्यालय प्राचार्या डॉ. त्रिशला कदम, लॉ कॉलेज प्राचार्या डॉ. चंद्राणी बागडी, विद्यार्थी उपस्थित होते. आभार प्रा. शशिकांत कुंभार यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. रोहित शिंगे, डॉ. अंजली उबाळे, डॉ. केतकी पाटील यांनी केले.

04/03/26

04/03/26

सकाळ गुरुवार, ५ मार्च २०२६



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांसमवेत संजय मोहिते, कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. एस. के. खाडे आदी.

# यशासाठी जिद्द, मेहनत आवश्यक

## संजय मोहिते : डीकेएएससी महाविद्यालयात पारितोषिक वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. ४ : हसऱ्या चेहऱ्यामागे अनेकदा कठोर परिश्रम आणि वेदनादायी अनुभव दडलेले असतात, यश सहज मिळत नाही. त्यासाठी सातत्य, जिद्द आणि अपार मेहनत आवश्यक असते, असे मत व्यक्त करत प्रसिद्ध सिनेअभिनेते संजय मोहिते यांनी अभिनय, कविता आणि किस्से ऐकवले.

येथील डीकेएएससी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण व शिक्षक-विद्यार्थी गुणगौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, तसेच प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी यशस्वी खेळाडू, विद्यार्थी, कलाकार आणि गुरुदेव कार्यकर्ते यांचा सन्मान करण्यात आला.

श्री. गावडे म्हणाले, 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा वारसा हे यशस्वी विद्यार्थी, खेळाडू आणि गुरुदेव कार्यकर्ते पुढे नेत आहेत, याचा मला अभिमान वाटतो. सचोटीने कष्ट करणाऱ्या प्रत्येकाच्या वाट्याला यश मिळतेच. शेला पागोटे आणि सायंकाळी सांस्कृतिक विभागाने नृत्यांचा आविष्कार सादर केला.

प्राचार्य डॉ. खाडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुभाष जाधव यांनी परिचय करून दिला. कार्याध्यक्ष प्रा. व्ही. पी. पाटील व कार्याध्यक्ष प्रा. बाळासाहेब चावरे यांनी अहवालवाचन केले. प्रा. मुजफ्फर लगीवाले यांनी वरिष्ठ जिमखाना विभागाचे, तर प्रा. लेफ्टनंट विनायक भोई यांनी ज्युनिअर जिमखाना व एन. सी सी. अहवालाचे वाचन केले.

प्राचार्या डॉ. त्रिशला कदम, प्राचार्या डॉ चंद्राणी बागडी, प्रा. डी. ए. यादव, डॉ. पी. के. वाघमारे, आर. बी. जोग, राजन मुठाणे आदी उपस्थित होते. प्रा. शशिकांत कुंभार यांनी आभार मानले. प्रा. रोहित शिंगे, डॉ. अंजली उबाळे व डॉ. केतकी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

05/03/2026

05/03/26

तरुण भारत शुक्रवार, ६ मार्च २०२६



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथील प्राणीशास्त्र विभागमार्फत क्षेत्रभेट उपक्रम राबविण्यात आला.

# डीकेएएससी प्राणीशास्त्र विभागातर्फे शैक्षणिक क्षेत्रभेट

**इचलकरंजी :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या प्राणीशास्त्र विभाग, पॅराडाईज नेचरक्लब अंतर्गत बी.एस्सी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी वरद विनायक मंदिर परिसर, पंचगंगा नदी किनारा येथे जैवविविधता व पाणथळ परिसंस्थेच्या अभ्यासासाठी शैक्षणिक क्षेत्रभेट आयोजित केली होती. कार्यक्रमाचे आयोजन विभागप्रमुख डॉ. पी. के. वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या क्षेत्रभेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना स्थानिक जैवविविधता, नदी परिसंस्था व पर्यावरण संवर्धन याबाबत प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता. याप्रसंगी नेचर कॉनर्झव्हेशन सोसायटी सांगलीचे संस्थापक डॉ. अमोल जाधव यांनी संसाधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले. त्यांनी नदी परिसंस्थेचे महत्त्व, जलचर व स्थलचर जैवविविधता, आर्द्रभूमीचे पर्यावरणीय योगदान तसेच जैवविविधतेच्या संवर्धनाची गरज याविषयी माहिती दिली. तसेच प्रत्यक्ष पक्षी निरीक्षण व प्रजाती ओळख तंत्र याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. निलोफर शेख, डॉ. अनुजा विभूते, प्रा. सोनाली हंकारे, प्रा. किशोर मदने, प्रा. विशाल कलकुटकी यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी विविध वनस्पती, पक्षी, कीटक व जलचर जीवांचे निरीक्षण करून प्रत्यक्ष ज्ञान संपादन केले. आभार प्रा. किशोर मदने यांनी मानले .

06/03/26

06/03/26

दै० सकाळ 5/03/2026

दैनिक सकाळ इचलकरंजी कार्यालय वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार" - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

स्थापना : जून १९६२

# दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

नॅक मानांकन "B+"

## अभ्यासक्रम कोर्सेस

- आर्टस् कॉमर्स, सायन्स शाखांसह कनिष्ठ व वरिष्ठ विभाग.
- विविध शाखांसह बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बी. सी. ए., बी. कॉम आयटी हे पदवी अभ्यासक्रम.
- एम. ए. मराठी, हिंदी, समाजशास्त्र आणि एम. एस्सी. बॉटनी व ऑरगॅनिक केमिस्ट्री या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची सोय.
- बॉटनी व केमिस्ट्री अभ्यासक्रमाचे शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त पीएच.डी संशोधन केंद्र.

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

♦ ६४ वर्षांची उच्च शैक्षणिक परंपरा ♦ इचलकरंजी परिसरातील एकमेव बहु विद्याशास्त्र महाविद्यालय ♦ एन. सी. सी. व एनएसएस विभाग ♦ सांस्कृतिक स्पर्धांची यशस्वी परंपरा ♦ सुसज्ज ग्रंथालय व प्रयोगशाळा ♦ स्वतंत्र अभ्यासिकेची सोय ♦ सीईटी, नीट, सेट, नेट परीक्षांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन ♦ कॉमर्स विभागासाठी इंग्रजी माध्यमाची सोय ♦ गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना ♦ भव्य इमारत व सुसज्ज क्रीडा विभाग ♦ सीसीटीव्ही कॅमेऱ्याची सोय ♦ कॉलेज परिसरात मोफत वाय फाय सुविधा ♦ स्पर्धा परीक्षा केंद्र व करिअर घडविणारी शिक्षण पध्दती

| मा. प्राचार्य. अभयकुमार साळुंखे | प्राचार्या सौ. शुभांगी गावडे | श्री. कौस्तुभ गावडे | प्रो. (डॉ.) एस. के. खाडे |
|---|---|---|---|
| कार्याध्यक्ष | सेक्रेटरी | मुख्य कार्यकारी अधिकारी | प्राचार्य |

सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी

फोन नं. (०२३०) २४२०४१२ www.dkasc.ac.in मेल- dkasccollege@gmail.com

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी

नॅक मानांकन "B++"

| मा. प्राचार्य. अभयकुमार साळुंखे | प्राचार्या सौ. शुभांगी गावडे | श्री. कौस्तुभ गावडे | प्रो. (डॉ.) त्रिशला कदम |
|---|---|---|---|
| कार्याध्यक्ष | सेक्रेटरी | मुख्य कार्यकारी अधिकारी | प्र.प्राचार्य |

सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी

फोन नं (०२३०) २४२४५४८ www.arpkmi.ac.in मेल- arpkanyacollege@gmail.com

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# दत्ताजीराव कदम लॉ कॉलेज, इचलकरंजी

## अभ्यासक्रम

- BA L.L.B ( पाच वर्षे) बारावीनंतर
- L.L.B (तीन वर्षे) पदवीनंतर

## आगामी अभ्यासक्रम

लवकरच कायद्याचे शिक्षण घेणाऱ्यांसाठी नवीन कोर्स सुरू होत आहेत.

- डिप्लोमा इन टॅक्सेशन लॉ
- डिप्लोमा इन लेबर लॉ

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

♦ इचलकरंजी शहरातील प्रथम कायद्याचे शिक्षण घेणारे महाविद्यालय ♦ बार कौन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली मान्यताप्राप्त आणि शिवाजी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय ♦ अनुभवी प्राध्यापक वृंद ♦ प्रशस्त कॉलेज कॅम्पस ♦ सुसज्ज ग्रंथालय आणि ई लायब्ररी ♦ अद्ययावत मूट कोर्ट ♦ तज्ञांकडून कायदेविषयक कार्यशाळा ♦ प्रवेश प्रक्रियेबाबत मोफत मार्गदर्शक व क्रॅश कोर्स सुविधा ♦ सीसीटिव्ही कॅमेऱ्यांची सोय ♦ कॉलेज परिसरात मोफत वायफाय सुविधा ♦ शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा केंद्र ♦ कौशल्यपूर्ण स्पर्धा उपक्रमांचे आयोजन

| मा. प्राचार्य. अभयकुमार साळुंखे | प्राचार्या सौ. शुभांगी गावडे | श्री. कौस्तुभ गावडे | डॉ. सी. एस. बागडी |
|---|---|---|---|
| कार्याध्यक्ष | सेक्रेटरी | मुख्य कार्यकारी अधिकारी | प्राचार्य |

सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी

फोन नं (०२३०) २९९१२९९ www.dklcich.ac.in मेल- principaldklc697@gmail.com

**चालू शैक्षणिक वर्षातील सीईटी परीक्षेसाठी अंतिम नोंदणी दिनांक**

**BA LL.B-------13/03/2026**

07/03/26

तरुण भारत सोमवार, ९ मार्च २०२६

# जात्यावरील ओवी जगण्याचं बळ देते

■ युवराज मोहिते यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
इचलकरंजी

जात्यावरील ओवी माणसाला जगण्याचं बळ देते, असे मत युवराज मोहिते यांनी व्यक्त केले. दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमा ते बोलत होते.

लहान मुलांवर संस्कार करण्यासाठी आईने गायलेली पहिली अंगाई म्हणजे कविता होय, असे सांगून त्यांनी मराठी साहित्यातील अनेक लेखिकांच्या लेखनाचा आढावा घेतला. संतांच्या पासून ते बहिणाबाई चौधरी यांच्या कविता व इतर लेखन कसे झाले हे सांगत त्यांनी अनुराधा पोतदार, हंसा वाडकर यांनी स्त्रियांचे प्रश्न साहित्यातून कसे मांडले आहेत हेही सांगितले.



ते म्हणाले, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात एकत्र कुटुंब पद्धती महत्त्वाची आहे. या युगात मराठी भाषेचा वापर सर्वांनी जाणीवपूर्वक केला पाहिजे. मोबाईलचा वापर करताना तो जबाबदारीने आणि काळजीपूर्वक केला पाहिजे. पुस्तक वाचनावर अधिक भर दिला पाहिजे. आयुष्यात जगण्यासाठी साहित्यातून आलेले व्यक्तीरेखांच्या माध्यमातून चांगले विचार वाचकांच्या मनावर परिणाम करतात. यातून माणसाचे मन, विचार, संस्कार, समृद्ध होतात. दाहकतेने जगलेले आयुष्य साहित्य लेखनाला प्रेरणा देते. हे सांगताना त्यांनी अण्णाभाऊ साठे, जयंत नारळीकर, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, नामदेव ढसाळ, किशोर शांताबाई काळे अशा नामवंत साहित्यिकांच्या साहित्यातील उदाहरणे देऊन साहित्यातील मानवी जीवनाचे स्वरूप सांगितले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे होते. त्यांनी, साहित्य हे माणसाच्या आयुष्याचे प्रतिबिंब आहे. माणूस जे आयुष्य जगतो तेच साहित्यातून वेगवेगळ्या वाङ्मय प्रकारातून अभिव्यक्त करतो, असे मत मांडले. पाहुण्यांचा परिचय डॉ. सुभाष जाधव यांनी करून दिला. सूत्रसंचलन भारती कोळेकर यांनी केले. याप्रसंगी डॉ. सुनील भोसले, श्री निलेश जाधव, डॉ. अशोक बोगुलवार, डॉ. वर्षा शिंदे, मान्यवर, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते. आभार रोहित शिंगे यांनी मानले.

09/03/26

09/03/26

तरुण भारत बुधवार, ११ मार्च २०२६

# डीकेएएससी महाविद्यालयात बँकिंग स्पर्धा परीक्षांवर मार्गदर्शन

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

येथील डीकेएएससी महाविद्यालयात कॉमर्स विभाग, फ्युचर प्रो इन्स्टिट्यूट आणि महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'बँकिंग स्पर्धा परीक्षा : संधी व तयारी' या विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमात बँकिंग स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेले बँक अधिकारी शितल कुंभार आणि शासकीय अधिकारी वैभव वासुदेव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दृकश्राव्य माध्यमांच्या साहाय्याने त्यांनी बँकिंग क्षेत्रातील विविध पदांवरील भरती प्रक्रिया, वेतन रचना, सुविधा आणि आर्थिक लाभ यांची सविस्तर माहिती दिली. बँकिंग क्षेत्रात अधिकारी म्हणून काम करताना जबाबदारी, निर्णयक्षमता आणि व्यवस्थापन कौशल्य किती महत्त्वाचे आहे, हेही त्यांनी स्पष्ट केले.

स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी नियमित आणि नियोजनबद्ध अभ्यास आवश्यक असल्याचे सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन केले. चांगल्या पुस्तकांचे वाचन, ताणतणावाचे व्यवस्थापन, सहनशीलता, आरोग्याची काळजी आणि सातत्यपूर्ण प्रयत्न ही यशाची महत्त्वाची सूत्रे असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी वास्तवाचे भान ठेवून विश्लेषणात्मक वृत्ती विकसित करावी आणि उच्च ध्येय निश्चित करून नकारात्मक घटकांपासून दूर राहावे, असेही त्यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. खाडे होते. स्वागत व प्रास्ताविक पूजा पारिशवाड यांनी केले. पाहुण्यांची ओळख विभागप्रमुख प्रा. विजय पाटील यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा. पल्लवी होगाडे यांनी केले. आभार प्रा. डॉ. आर. एस. रॉड्रिक्स यांनी मानले.

11/03/26

तरुण भारत सोमवार, १६ मार्च २०२६

# एआयच्या युगात अद्ययावत आत्मसात करा

- सीए पवनकुमार सोनी यांचे आवाहन
- टॅली प्राईम सॉफ्टवेअरच्या माध्यमातून अकौंटींग नोंदी करण्याचे मार्गदर्शन
- डीकेएएससी कॉलेजमध्ये टॅली विथ जीएसटी कार्यशाळा



इचलकरंजी : कार्यशाळेत व्ही. पी. पाटील, सीए पवनकुमार सोनी, पंकज मेहता यांचे स्वागत करताना सोबत प्रा. पूजा पारिशवाड, डॉ. रितू रॉड्रिक्स, प्रा. प्रथमेश गवळी, प्रा. कल्पना जाधव, प्रा. पल्लवी होगाडे, कोमल सुतार.

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील डी. के. ए. एस. सी. कॉलेजच्या कॉमर्स विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी टॅली विथ जीएसटी यावर उपयुक्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आधुनिक अकौंटींग प्रणाली व जीएसटी संदर्भातील मार्गदर्शन देण्यात आले.

पहिल्या सत्रात सीए पवनकुमार सोनी यांनी, एआयच्या युगात विद्यार्थ्यांनी अद्ययावत ज्ञान व कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. तसेच जीएसटी प्रणालीची मूलभूत माहिती त्यांनी उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केली.

दुसऱ्या सत्रात एम कॉम्प्युटर्सचे संस्थापक पंकज मेहता यांनी, विद्यार्थ्यांना टॅली विथ जीएसटीसंदर्भात प्रात्यक्षिक दाखविले. त्यांनी टॅली प्राईम सॉफ्टवेअरच्या माध्यमातून अकौंटींग नोंदी कशा कराव्यात, जीएसटी व्यवहार कसे हाताळावेत याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे उद्घाटन कॉमर्स विभागप्रमुख प्रा. व्ही. पी. पाटील यांनी केले. प्रा. पूजा पारिशवाड यांनी, विद्यार्थ्यांनी करिअरमध्ये प्रगती साधण्यासाठी अकौंटींग सॉफ्टवेअर व व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

डॉ. रितू रॉड्रिक्स यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. स्वप्निल जगदाळे यांनी केले. कार्यशाळेस प्रा. कल्पना जाधव, प्रा. पल्लवी होगाडे, प्रा. प्रथमेश गवळी, प्रा. कोमल सुतार, विद्यार्थी उपस्थित होते.

16/03/26

16/03/26

सकाळ, सोमवार, १६ मार्च २०२६

# डीकेएएससी कॉलेजमध्ये प्रबंध लेखनावर कार्यशाळा



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये संशोधन पेपर लेखन व प्रबंध लेखन कार्यशाळा झाली.

इचलकरंजी, ता. १५ : डीकेएएससी कॉलेजमध्ये संशोधन पेपर लेखन व प्रबंध लेखन मांडणी या विषयावर कार्यशाळा झाली. मराठी व हिंदी पदव्युत्तर विभाग, रिसर्च विभाग आणि आयक्यूएसी विभागातर्फे आयोजन केले. प्रमुख वक्ते म्हणून विवेकानंद कॉलेज येथील डॉ. दीपक तुपे, प्रभारी प्राचार्य डॉ. विठ्ठल रोटे, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांची उपस्थिती होती.

डॉ. तुपे यांनी संशोधन पेपर लेखनाची पद्धत, विषय निवड, संदर्भग्रंथांचा वापर तसेच संशोधनातील शिस्त याविषयी मार्गदर्शन केले. योग्य विषयांची निवड, मांडणीतील वेगळेपण आणि भाषेतील शुद्धता यामुळे संशोधन पेपर उत्कृष्ट पद्धतीने बनवता येतो, असे त्यांनी सांगितले. द्वितीय सत्रात डॉ. रोटे म्हणाले, ''प्रबंध लेखन हा संशोधनाचा नंतरचा टप्पा आहे. पण त्यापूर्वी समृद्ध वाचन, योग्य विषयाची निवड, प्रबंधाचे टप्पे, त्याची सजगपणे जाण ठेवून कोणत्या विषयावर व का संशोधन करत आहोत याचा हेतू समजून घेणे हे संशोधन प्रबंध लेखनासाठी महत्त्वाचे ठरते. ''प्रबंध लेखन मांडणी, प्रबंधाची रचना, मांडणीची पद्धत, संदर्भ लेखन आणि संशोधनातील तांत्रिक बाबी याबाबत महत्त्वपूर्ण माहिती विविध लिखित प्रबंधांच्या माध्यमातून त्यांनी सांगितली.

मराठी विभागप्रमुख डॉ. सुभाष जाधव यांनी प्रास्ताविक केले. हिंदी विभागप्रमुख प्रा. नीलेश जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. किशोरी टोपणे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. रोहित शिंगे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अंजली उबाळे, प्रा. भारती कोळेकर, प्रा. अपर्णा कांबळे आदी उपस्थित होते.

16/03/26

16/03/26

सकाळ, सोमवार, १६ मार्च २०२६



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये टॅली विथ जीएसटी या विषयावर कार्यशाळा झाली.

# डीकेएएससी कॉलेजमध्ये 'जीएसटी'वर कार्यशाळा

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये कॉमर्स विभागांतर्गत टॅली विथ जीएसटी या विषयावर कार्यशाळा झाली. पहिल्या सत्रात सीए पवनकुमार सोनी यांनी विद्यार्थ्यांना एआयच्या युगात सजग असणे आवश्यक असल्याचे सांगत जीएसटीची उदाहरणासहित सोप्या शब्दात माहिती दिली. दुसऱ्या सत्रात पंकज मेहता यांनी विद्यार्थ्यांना टॅली प्राईम सॉफ्टवेअरबाबत माहिती दिली. कॉमर्स विभाग प्रमुख प्रा. व्ही. पी. पाटील यांनी स्वागत केले. प्रा. पूजा पारिशवाड यांनी कार्यशाळेचा उद्देश सांगितला. डॉ. रितू रॉड्रिक्स यांनी आभार मानले. प्रा. स्वप्नल जगदाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. कल्पना जाधव, प्रा. पल्लवी होगाडे, प्रा. प्रथमेश गवळी, प्रा. कोमल सुतार आदी उपस्थित होते.

16/03/26

16/03/26

सकाळ बुधवार, १८ मार्च २०२६

# डीकेएएससीच्या विद्यार्थ्यांची जे. पी. पारसिक बँकेला भेट

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले होते. येथील जे. पी. पारसिक सहकारी बँकेला विद्यार्थ्यांनी भेट देऊन बँकेच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली. बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना बँकेची रचना, ठेवी, कर्ज व्यवहार, डिजिटल बँकिंग सेवा, ग्राहक सेवा तसेच सहकारी बँकांचे स्थानिक अर्थव्यवस्थेतील महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारून बँकिंग व्यवस्थेबाबत माहिती जाणून घेतली. प्राचार्य डॉ एस. के. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. एच. बोगुलवार, डॉ.वर्षा शिंदे प्रा. एस. एस. पाटील, प्रा. बाजीराव वारंग आदींनी नियोजन केले.

18/03/2026

18/03/26

तरुण भारत मंगळवार, २४ मार्च २०२६

# डीकेएएससी महाविद्यालयात आर्थिक साक्षरता प्रशिक्षण

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयात आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. स्वयंसिद्धा, आदिशक्ती–स्त्री शक्ती केंद्र आणि माणदेशी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमात माजी विद्यार्थिनी अमृता कोनिरे यांनी माणदेशी फाऊंडेशनच्या कार्याची माहिती देत महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी वित्तीय साक्षरता, उद्योजकता आणि कौशल्य विकास यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थिनींना आर्थिक व्यवहारांचे नियोजन, अनावश्यक खर्च टाळणे, बचत आणि योग्य गुंतवणुकीचे तंत्र सोप्या उदाहरणांसह स्पष्ट केले. मार्गदर्शक पुस्तकांच्या माध्यमातून चित्रांच्या सहाय्याने आर्थिक संकल्पना समजावून सांगण्यात आल्या. अध्यक्षस्थानी प्रा. विजय पाटील होते. त्यांनी महिलांची बचत आणि कुटुंबाच्या आर्थिक नियोजनातील भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद केले. प्रास्ताविक प्रा. पूजा पारिशवाड यांनी केले. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन स्वप्नल जगदाळे यांनी केले. आभार वर्षा शिंदे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

सकाळ, गुरुवार, २६ मार्च २०२६



इचलकरंजी : 'डीकेएएससी' महाविद्यालयात आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमात अमृता कोनिरे यांचे स्वागत करण्यात आले.

# 'डीकेएएससी'मध्ये आर्थिक साक्षरता प्रशिक्षण

**इचलकरंजी :** 'डीकेएएससी' महाविद्यालयात स्वयंसिद्धा, आदिशक्ती-स्त्रीशक्ती आणि माणदेशी फाउंडेशनतर्फे महिला आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम.झाला. अमृता कोनिरे यांनी माणदेशी फाउंडेशनच्या कार्याची माहिती देऊन आर्थिक साक्षरताद्वारे महिलांना अधिक सक्षम करण्यासाठी वित्तीय साक्षरता, उद्योजकता व कौशल्य विकास यांचे महत्त्व पटवून दिले. अध्यक्षस्थानी वाणिज्य विभागप्रमुख प्रा. विजय पाटील होते. समन्वयक प्रा. पूजा पारिशवाड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. स्वप्नील जगदाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. वर्षा शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा डॉ. आर. एस. रॉड्रिक्स, प्रा. पद्मा पाटील, ग्रंथपाल प्रतिभा पाचंगे, स्वाती देसाई, प्रा. कल्पना जाधव, प्रा. पल्लवी होगाडे, प्रा. कोमल सुतार, प्रा. शेफाली पाटील, प्रा. किशोरी टोणपे, प्रा. मीनाक्षी मिणचे, प्रा. प्रियांका पाटील उपस्थित होते.

27/03/26

27/03/26

सकाळ बुधवार, १५ एप्रिल २०२६

## डीकेएएससी कॉलेज

प्रा. डी. ए. यादव यांच्या हस्ते डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. डॉ. सुभाष जाधव, डॉ. एस. टी. इंगळे, प्रबंधक आर. बी. जोग, डॉ. ए. एच. बोगुलवार, डॉ. सुनील भोसले, प्रा. पूजा पारिशवाड, प्रा. रोहित शिंगे, प्रा. संदीप पाटील, प्रा. ज्योत्स्ना सोनवणे आदी उपस्थित होते.

15/04/26

पुढारी
कोल्हापूर, मंगळवार, २१ एप्रिल २०२६



कोल्हापूर : सरकारी-निमसरकारी कर्मचारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपाला सोमवारी मध्यरात्री प्रारंभ झाला. सीपीआर आवारात निदर्शने करण्यात आली. यावेळी उपस्थित अनिल लवेकर, वसंत डावरे, रमेश भोसले, नितीन कांबळे आदी. (छाया : मिलन मकानदार)

# सरकारी कर्मचाऱ्यांसह शिक्षकांचा बेमुदत संप सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जुनी पेन्शन योजना लागू करावी आणि सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेची अधिसूचना त्वरित काढावी, या मुख्य मागण्यांसाठी सरकारी आणि निमसरकारी कर्मचारी, शिक्षक सोमवारी (दि. २०) मध्यरात्रीपासून बेमुदत संपावर गेले. सीपीआर रुग्णालयाच्या आवारात निदर्शने करत संपाला सुरुवात झाली. जिल्ह्यात हा संप यशस्वी करण्याचा निर्धारही यावेळी करण्यात आला.

जिल्ह्यात शाळांत सध्या परीक्षा, निकाल आणि जनगणनेची कामे सुरू आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ज्या संघटनांची कामे तातडीची आहेत, त्यांना संपातून सवलत देण्यात आली आहे. यामुळे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा या संपात मोठा सहभाग राहील. मंगळवारपासून जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांतील कामकाज ठप्प होईल; असे समन्वय समितीचे निमंत्रक अनिल लवेकर यांनी सांगितले.

मंगळवारी सकाळी साडेदहा वाजता महावीर गार्डन येथे निदर्शने केली जाणार आहेत. संप कालावधीत याच ठिकाणी दररोज सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत सर्व कर्मचारी एकत्र येऊन निदर्शने करणार आहेत.

**● आज महावीर उद्यानात निदर्शने; संप यशस्वी करण्याचा निर्धार**

### शिस्तभंगाची कारवाई करणार : सरकारचा आदेश

संपाबाबत शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असे आदेश राज्य शासनाने काढले आहेत. संप कालावधीत कामकाज सुरळीत राहील, याकरिता विभागप्रमुखांनी मुख्यालय सोडू नये, असेही आदेश देत विविध सूचनाही देण्यात आल्या आहेत.